सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२६ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जागावाटपातील वाटाघाटीवर राहुल गांधी राज्यातील नेत्यांवर नाराज; CEC बैठकीत सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ नवी दिल्ली**

जागावाटपावरून राहुल गांधी काँग्रेस नेत्यांवर नाराज आहेत. काँग्रेसच्या निवडणूक कमिटीच्या बैठकीत राहुल गांधींनी आपली नाराजी बोलून दाखवली आहे. महाविकास आघाडी झालेल्या जागावाटपाच्या चर्चांमध्ये राज्यातील नेत्यांनी वाटाघाटी व्यवस्थित केली नाही. तसेच राज्यात देण्यात आलेल्या ओबीसी उमेदवारांबाबतही राहुल गांधी काँग्रेस नेत्यांवर नाराज असल्याचं बोललं जात आहे.

महाविकास आघाडीतील ठाकरे गट आणि शरद पवार गट राष्ट्रवादीसोबत झालेल्या जागावाटपाच्या चर्चांमध्ये काँग्रेस नेत्यांना योग्य भूमिका मांडता आली नसल्याची मत राहुल गांधी यांनी आज झालेल्या काँग्रेस निवडणूक कमिटीच्या बैठकीत मांडलं. या बैठकीत त्यांनी नाराजी जाहीर केलीय. दरम्यान काँग्रेसने आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केलीय. पहिल्या यादीत काँग्रेसने ४८ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. परंतु काँग्रेसला मिळालेल्या आणि काँग्रेसने सोडलेल्या जागांवरून काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि खासदार राहुल गांधी हे नाराज आहेत.

दरम्यान या बैठकीत राहुल गांधींनी राज्यातील नेत्यांना काही सुचना दिल्या आहेत. ओबीसीतील दुर्लक्षित जातींना उमेदवारांच्या यादीत स्थान द्या. ओबीसींच्या जागांवर विशेष लक्ष द्या. आपण जातीय जनगणना आणि ओबीसी मुद्यावर आक्रमक आहोत त्यामुळ त्यांना प्रतिनिधित्व मिळाल पाहिजे, अशा सुचना राहुल गांधी यांनी राज्यातील नेत्यांना दिल्या आहेत.

मुंबई आणि विदर्भात, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसला कमी जागा मिळाल्या आहेत. येथील काही जागा मित्रपक्षांना सोडल्याप्रकरणी राहुल गांधी नाराज असल्याचं सांगितलं जात आहे. याप्रकरणी बोलतांना नाना पटोले म्हणाले, महाराष्ट्रात काँग्रेसला जास्त जागा मिळाल्या पाहिजे होत्या. हे खरं आहे. राज्यातील विदर्भ, मराठावाडा, मुंबई,पश्चिम महाराष्ट्रात, उत्तर महाराष्ट्रात मेरिटच्या आधारे काँग्रेसला जास्त जागा मिळाल्या पाहिजे होत्या.

## भाजपचे स्टार प्रचारक ठरले, पंतप्रधान मोदी, नवतीन राणा, नारायण राणेंसह ४० जणांची तोफ धडाडणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. राज्यात प्रचार करण्यासाठी भाजपकडून ४० स्टार प्रचारकांचा समावेश करण्यात आलाय. त्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप अध्यक्ष जे पी नड्डा, मंत्री राजनाथ सिंह,नवनीत राणा यांच्यासह अनेक दिग्गजांना स्थान देण्यात आलेय. भाजपचे बहुतांशी राज्यातील मुख्यमंत्री यांचा देखील स्टार प्रचारक यादीत समावेश करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी जारी करण्यात आलेल्या स्टार प्रचारकांच्या यादीमध्ये राज्यातील दिग्गजांचाही समावेश आहे. त्यामध्ये नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे, अशोक चव्हाण, आशिष शेलार, पंकजा मुंडे, मुरलीधर मोहोळ यासह अनेक दिग्गज स्टार प्रचारकांच्या यादीत आहेत.

स्टार प्रचारकाच्या यादीत कोण कोण?

पंतप्रधान नरेंद्र मोदी, जेपी नड्डा, राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, प्रमोद सावंत, भुपेंद्र पटेल, विष्णू देव साई, मोहन यादव, भजनलाल शर्मा, नायम सिंह सैनी, हेमंत बिस्वा, शिवराज सिंह चौव्हाण, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, नवनीत राणा, शिव प्रकाश, भुपेंद्र यादव, अश्विनी वैष्णव, नारायण राणे, पियुष गोयल, ज्योतिरादित्य शिंदे, रावसाहेब दानवे, अशोक चव्हाण, उदयनराजे भोसले, विनोद तावडे, आशिष शेलार, पंकजा मुंडे, चंद्रकात पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, स्मृती इराणी, प्रवीण दरेकर, अमर साबळे, मुरलीधर मोहोळ, अशोक नेते, संजय कुटे

## आमची चूक; मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर करावी; मराठा आरक्षणावरून चंद्रकात पाटील थेट बोलले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६सांगली**

ऐन विधानसभा निवडणुकीत मराठा आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मराठा आरक्षणाचा मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मराठा आरक्षणावरून राजकीय पक्षातील बडे नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत आहेत. त्यामुळे या विधानसभेत मराठा आरक्षणाचा मुद्दा गाजणार आहे, हे निश्चित झालं आहे. एकीकडे मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे यांच्याकडून सत्ताधाऱ्यांवर टीका केली जात आहे. याचदरम्यान, मराठा आरक्षणावरून चंद्रकांत पाटील यांनी भाष्य केलं आहे.

चंद्रकांत पाटील सध्या सांगलीच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान, चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील विविध राजकीय घडामोडींवर भाष्य केलं. चंद्रकांत पाटील म्हणाले, 'आमचं चुकलं काय? कधी न दिलेले आरक्षण देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. उद्धव ठाकरे यांच्या काळात आरक्षण गेले. एकनाथ शिंदे यांच्या काळात दिले हे चुकलं का? राज्यात ७८ हजार कुणबी नोंदी सापडल्या आहेत. या सगळ्यात आमची चूक झाली का? जरांगे समजून घेणार नसतील तर सामन्य मराठा समाज समजून घेईल. मनोज जरांगे यांनी खऱ्याला खरे म्हणायला शिका. आम्ही अजूनही कागदपत्रे घेऊन चर्चेला बसायला तयार आहे. आमचं चुकलं काय, हे त्यांनी जाहीर करावं'.

वसंत देशमुख यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर भाष्य करताना चंद्रकांत पाटील म्हणाले, 'एखाद्या व्यक्तीनं म्हणणे हा त्याचा व्यक्तीचा दोष असू शकतो. ती आमच्या पक्षाची संस्कृती नाही. जे देशमुख बोलले, त्या सर्वांना समजण्यात आलं आहे. आपल्या बोलण्यात सर्वांनीच आदर व्यक्त केला पाहिजे'.

विधानसभेत विजय होईल, असा विश्वास चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. 'राज्यात पराभूत १७ लोकसभा मतदारसंघातील १३० विधानसभेत भाजपच पुढे आहे. त्यामुळे आम्ही पिछाडीवर आहोत, याबाबत विरोधक हवेत आहे. याचा आम्हालाच फायदा होईल, असे वक्तव्य चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केलं.

## 'दरवेळी ऑफर देतात'; बाळासाहेब थोरात-संजय राऊतांबद्दल देशमुखांचा गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६सांगली**

भाजपाचे नेते वसंतराव देशमुख यांनी बाळासाहेब थोरात यांच्या कन्येबद्दल वादग्रस्त विधान केल्यामुळे चर्चेत आले. वसंतराव देशमुख यांनी याच कार्यक्रमात बाळासाहेब थोरात आणि संजय राऊतांवरही टीका केली. बाळासाहेब थोरात शरद पवार आणि उद्धव ठाकरेंच्या पाया पडतात. ते शरद पवारांचा पट्टा गळ्यात घालून फिरतात, असे वसंतराव देशमुख म्हणाले. इतकंच नाही, तर संजय राऊतांबद्दलचा एक जुना किस्सा सांगताना मी त्यांना तुम्ही सुपारी बहाद्दर आहात, असे म्हटलो होतो, असा दावाही त्यांनी या सभेत केला.

**उद्धव ठाकरे, संजय राऊतांना ऑफर**

गेली २०-२५ वर्षे हा

माणूस उद्धव ठाकरे आणि त्यांचा संजय राऊत यांच्याशी संधान ठेवून होता. दरवेळी ऑफर द्यायचा. जो उमेदवार कमी मतं घेईल, असा उमेदवार आम्हाला द्या. त्याच्या बदल्यात आम्ही तुम्हाला काहीही देतो, असा आरोप वसंतराव देशमुख यांनी बाळासाहेब थोरातांवर केला.

**संजय राऊतांना म्हणालो, तुम्ही सुपारी बहाद्दर आहात**

यावेळी वसंतराव देशमुख यांनी संजय राऊतांसोबतचा जुना किस्सा सांगितला. ते म्हणाले, पाच वर्षापूर्वी आमच्या एका नातेवाईकाच्या पत्नीच्या अत्यंसंस्काराला मी गेलो होतो. ते आयएएस अधिकारी होते. त्यांच्या घरी संजय राऊत आले. त्यांना माझी ओळख करून दिली. त्यांनी (संजय राऊत) मला विचारलं की, आमच्या शिवसेनेला तिथे स्थान का मिळत नाही? मी म्हटलं तुम्हाला पैसे पाहिजे. मिस्टर संजय राऊत, तुम्ही सुपारी बहाद्दर आहात, असे सांगत देशमुखांनी थोरात आणि राऊतांवर टीका केली.

## टीम इंडियाला घरच्या मैदानात धोबीपछाड; न्यूझीलंडनं पहिल्यांदाच कसोटी मालिका जिंकत रचला इतिहास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ पुणे**

टॉम लॅथमच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघाने मिचेल सँटनरच्या सर्वोत्तम खेळीच्या जोरावर पुण्याचं मैदान मारत इतिहास रचला. ३ सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० अशी आघाडी घेत किवी संघाने मालिका भारतीय मैदानात कसोटी मालिका जिंकण्याच स्वप्न साकार केले आहे. १९५५ पासून पहिली कसोटी मालिका जिंकण्याची त्यांची धडपड पुण्याच्या मैदानात संपली. श्रीलंकेच्या मैदानात मार खाऊन आलेल्या किवींनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण तिन्ही क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरीचा नजराणा

पेश करत भारतीय मैदानात ऐतिहासिक कामगिरीसह मालिका जिंकून दाखवलीये.

न्यूझीलंडनं रचलेल्या ऐतिहासिक स्क्रिप्टमुळे मायदेशात टीम इंडियाच्या मालिका विजयाचा सिलसिला संपुष्टात आला. याआधी २०१२ मध्ये टीम इंडियाने घरच्या मैदानात मालिका गमावली होती. त्यानंतर भारतीय संघाने घरच्या मैदानावर एकही मालिका गमावली नव्हती. सलग १८ मालिका जिंकण्याचा विक्रम टीम इंडियाच्या नावे होता. पण पाहुण्या न्यूझीलंडनं भारतीय संघाचा विजयी रथ रोखत नवा इतिहास रचला आहे.

## ऐन निवडणुकीत महाराष्ट्रात नवीन राजकीय पक्षाचा उदय; २८८ जागा लढवणार

**विदर्भ प्रजासत्ताक पुणे -१६**

राज्यात निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. त्यात २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. महायुती असो मविआ, मनसे असो किंवा वंचित, तिसरी आघाडी, चौथी आघाडी सगळीकडेच इच्छुकांची भाऊगर्दी झाली आहे. अशावेळी राज्यात नवीन राजकीय पक्षाचा उदय झाला आहे. हा पक्ष यंदाच्या निवडणुकीत २८८ जागांवर उमेदवार उतरवणार आहे. छत्रपती शासन असं या पक्षाचं नाव असून त्याचे प्रमुख प्राध्यापक नामदेवराव जाधव हे आहेत.

प्रा. नामदेव जाधव यांनी बारामती लोकसभा निवडणूक लढवली होती. त्यात २ हजार १३६ मते मिळाली. ती दारू न पाजता, पैसे न देता आणि कुणाच्या पाया न पडता मिळवली असल्याचं ते सांगतात. या निवडणुकीत जाधव यांचे डिपॉझिट जप्त झाले, मात्र डिपॉझिटची चिंता कसली, सरकारकडे महसूल दिला. २५ हजार माझा कर भरला. विधानसभेला २८८ जागा लढवणार आहोत. प्रस्थापित पक्षाकडे उमेदवारीसाठी १०-१० कोटी मोजावे लागतात. ५० कोटी त्यांचे निवडणुकीचे बजेट आहे. आम्ही छोटं रोपटं लावतोय. त्याचे वटवृक्ष होईल

असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तर छत्रपती शासन हा पक्ष नवीन उदयास आला आहे. तो २८८ उमेदवार उतरवणार आहे. जे कुठल्याही राजकीय घराण्यातून आले नाहीत, कुठल्याही गुन्हेगारी पार्श्वभूमीचे नाहीत. किमान पदवीधर असतील, ४० पेक्षा जास्त वय नसेल अशांना उमेदवारी देतोय. सध्या आम्ही ५ उमेदवार ठरवलेत. त्यात भोर विधानसभेतून माजी सरपंच भाऊसाहेब मरगळे, कसबा मतदारसंघातून यूपीएससी तयारी करणारे अरविंद वेलकर, माढा मतदारसंघातून अभिमान लोंढे यांना उमेदवारी देण्यात आली आहे असं नामदेव जाधव यांनी म्हटलं.

## जिल्ह्यात महायुती, कि महाविकास आघाडी कोण मारेल बाजी?

### वंचित, बसपाचे उमेदवारही मैदानात बंडखोरांची डोकेदुखी कोणाला पडेल भारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

महायुती, महाविकास आघाडीत जागा वाटपावरून रस्सीखेच झाली असली जाहीर झालेल्या उमेदवारीवरून काँग्रेसला बुरूज शाबूत ठेवण्याचे मोठे आव्हान आहे, तर यंदा भाजपने मित्रपक्षाच्या मदतीने आमदारांच्या संख्येत वाढ करण्याची रणनीती आखली आहे. जिल्ह्यातील आठपैकी तीन मतदारसंघ काँग्रेस, दोन प्रहार, तर भाजप, अपक्ष अन् स्वाभिमानी पक्ष असे मिळून प्रत्येकी एक, अशी संख्या आहे. जागा वाटपात भाजपवर अन्याय झाल्याचा सूर असला तरी येत्या काळात महायुती धर्म पाळला जातो का? यावरही बरेच चित्र अवलंबून असणार आहे.

विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर काही दिवसांत भाजपने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत अमरावती जिल्ह्यातून दोन उमेदवारांच्या नावांची घोषणा केली, तर शिंदेसेनेला दर्यापूर तर अजित पवार गटानेही अमरावतीत विद्यमान आमदाराला संधी दिली आहे.

महायुतीतून बडनेराची जागा युवा स्वाभिमानला जाणार आहे, तर दुसरीकडे मेळघाट, मोर्शीच्या जागेबाबत महायुती, महाविकास आघाडीत एकमत झाले नाही. महाविकास आघाडीत दर्यापूर आणि बडनेऱ्यात उद्धवसेनेने उमेदवार जाहीर केला आहे. मात्र, महाविकास आघाडीतून काँग्रेसला अमरावती, तिवसा, धामणगाव रेल्वे, अचलपूर या चार जागा मिळाल्या असून त्या सुरक्षित ठेवण्याचे मोठे आव्हान आहे, तर भाजपला धामणगाव रेल्वे, अचलपूर, तिवसा, मेळघाट, मोर्शी या पाच मतदारसंघाव्यतिरिक्त मित्रपक्षाकडे असलेल्या दर्यापूर, बडनेरा, अमरावती या जागांवर नजरा लागल्या आहेत.

वंचित, बसपाचे उमेदवारही मैदानात असतील. बंडखोरांची डोकेदुखी महायुती व महाविकास आघाडीला सहन करावी लागेल, असे तूर्त चित्र आहे. मात्र कोणत्या पक्षाकडे कोणती आणि कोणत्या पक्षाकडे उमेदवार यानंतरच मतदारसंघाचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## भाजपची २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

विधानसभा निवडणुकांसाठी भाजपने २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. यापूर्वी, ९९ उमेदवारांची पहिली यादी भाजपने जाहीर केली होती. त्यामुळे, भाजपकडून आत्तापर्यंत १२१ उमेदवारांची नावे जाहीर झाली आहेत. भाजपच्या दुसऱ्या यादीतही देवेंद्र फडणवीसांच्या मर्जीतील नेत्यांनाच संधी मिळाल्याचं पाहायला मिळत आहे. भाजपच्या दुसऱ्या यादीत भाजच्या दुसऱ्या यादीत जतमधून गोपीचंद पडळकर यांना संधी देण्यात आली असून अकोल्यातून विजय अग्रवाल यांना उमेदवारी मिळाली आहे. तर, नाशिक मध्य मतदारसंघातून देवयानी फरांदे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. यासह, पुण्यातील तीन मतदारसंघात उमेदवार जाहीर झाले असून खडकवासलामधून भीमराव तापकीर, पुणे कंन्टोनमैंट मतदारसंघातून सुनिल कांबळे, कसबा पेठ मतदारसंघातून हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपने जाहीर केलेल्या दुसऱ्या यादीत सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर मतदारसंघातून समाधान औताडे यांना तिकीट देण्यात आलंय. त्यामुळे, प्रशांत परिचारक यांना संधी मिळणार नसल्याचे स्पष्ट झालं आहे.

संपादकीय .....

# लोका सांगे ब्रह्मज्ञान

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा ज्वर चढण्यास सुरुवात झाली आहे. हा ज्वर महिनाभर राहील. त्यामुळे या महिन्याच्या अखेरीस सुरू होणार्या दिवाळीचा उत्साह नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीपर्यंत कायम राहणार आहे. सर्वसामान्यपणे मतदारसंघांमध्ये दुरंगी, तिरंगी किंवा जास्तीत जास्त चौरंगी लढत पाहायला मिळते, पण यावेळी मात्र असे चित्र फार कमी मतदारसंघांमध्ये पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

गेल्या पाच वर्षांत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांची झालेली चार शकले आणि त्यानंतर राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी सरसावलेले इतर छोटे पक्ष किंवा संघटना यामुळे बहुतांश मतदारसंघांमध्ये निवडणूक रंगतदार होईल असे दिसते. लोकसभा निवडणुकीत भाजपाने देशात 'अब की बार चारसौ पार' आणि महाराष्ट्रात '४५+'ची घोषणा दिली होती आणि देशासह महाराष्ट्रात ते अक्षरश: तोंडावर आपटले.

यातून धडा घेत महायुतीकडून केवळ आमचेच सरकार पुन्हा सत्तेवर येणार, एवढाच दावा करण्यात येत आहे. विधानसभेत बहुमत जिंकल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२४ च्या निवडणुकीत २०० पेक्षा अधिक जागा जिंकू, असा दावा केला होता हे उल्लेखनीय, मात्र याबाबत आता 'ब्र'ही काढला जात नाही, तर दुसरीकडे लोकसभा निवडणूक जिंकल्यानंतर महाविकास आघाडीचा उत्साह दुणावला असल्याने जागावाटपात रस्सीखेच सुरू आहे.

विशेषत: काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने आग्रही भूमिका घेतल्याचे सांगण्यात येते, मात्र महाविकास आघाडीकडूनही किती जागा जिंकणार हे आता ठामपणे सांगितले जात नाही. फक्त राज्यात सत्तापालट होईल, एवढेच महाविकास आघाडीचे नेते सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवारांच्या याद्या एकापाठोपाठ एक प्रसिद्ध होत आहेत. त्यात बहुतांश प्रस्थापित आमदारांनाच तिकीट देण्यात आले आहे, जेणेकरून बंडखोरीचा फटका बसणार नाही याची काळजी सर्वच पक्षांनी घेतल्याचे दिसते.

आधीच मतविभाजनाचा धोका असल्याने कोणी जोखीम पत्करलेली नाही. फक्त प्रस्थापितांना जपतानाच घराणेशाहीचाच बोलबाला असल्याचे या याद्यांवरून दिसते. यातून कुठलाही पक्ष सुटलेला नाही. श्रीमद्भगवद्गीतेत 'जे आज तुझे आहे ते काल दुसर्याचे होते आणि उद्या दुसर्याचे असेल' असे म्हटले आहे, मात्र या राजकारण्यांच्या बाबतीत 'जे आज तुझे आहे ते काल दुसर्याचे होते,' इथपर्यंत बरोबर असते, पण पुढे 'उद्या ते तुमच्याच कुटुंबीयांचे राहील' असला प्रकार असतो. सर्वात आधी भाजपाने ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली.

त्यात शंकर जगताप, सध्या जेलमध्ये असलेले कल्याणचे आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड, प्रतिभा पाचपुते, श्रीजया चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिंदे गटानेही ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करताना शिवसेनेतील बंडामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साथ देणार्या सर्व आमदारांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. याशिवाय नेत्याची पत्नी, मुलगा आणि भावाला उमेदवारी देत घराणेशाहीसुद्धा जपली आहे.

मनीषा वायकर, विलास भुमरे, अमोल चिमणराव पाटील, अभिजित अडसूळ, किरण सामंत, सुहास बाबर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. यात महायुतीचाच घटक पक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मागे कसा राहील. त्यांच्या यादीतही प्रस्थापित आणि घराणेशाहीचे प्रतिनिधित्व करणार्यांचा समावेश आहे. या पक्षाचे प्रमुख अजित पवार हेच घराणेशाहीचे जवळपास ३० वर्षे प्रतीक आहेत.

त्यानंतर धनंजय मुंडे, अदिती तटकरे वगैरे नेत्यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही अमित ठाकरे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार म्हणून रोहित पवार, रोहित पाटील, भाग्यश्री अत्राम, संदीप नाईक अशी काही नावे चर्चेत आहेत.

अशा रीतीने घराणेशाहीवरून काँग्रेस तसेच ठाकरे गटाला कायम टीकेचे लक्ष्य करणारेही घराणेशाहीतून सुटलेले नाहीत. 'विचारांचा वारसा पाहिजे' अशा वल्गना करणारेच तिकीटवाटपात आपल्या नातलगांची, कुटुंबीयांची वर्णी लावण्यात आग्रही असल्याचे दिसते. मुळात नीतिमत्तेशी काहीही देणेघेणे नसलेले कोणत्या 'विचारांच्या वारशा'बद्दल बोलत आहेत हेच आकलनापलीकडचे आहे. स्वहितासाठी पक्षबदल करणारे राजकारणी कुठेही गेले तरी 'आपले कुटुंब सर्वप्रथम' याच तत्त्वाला प्राधान्य देतात हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

यात भरडला जातो तो या नेत्यांच्या मागेमागे धावणारा कार्यकर्ताच. हे निर्ढावलेले नेते सर्वसामान्य, कष्ट उपसणार्या कार्यकर्त्यांचा किती विचार करीत असतील? उलट हे नेते त्यांचा नुसता वापर करतात हेच सत्य आहे. 'गुणवत्तेचं भांडवल वाममार्गासाठी करणारे या देशात खूप चतुर माणसं आहेत. म्हणूनच माणसं श्रीमंत होत गेली आणि देश आहे तिथेच राहिला. धूर्त लोक प्रामाणिक माणसांच्या शोधात असतात. अशा माणसांपासून दूर राहिले पाहिजे.

'काय सेवा करू?' अशी भाषा वापरणारी माणसं स्वत:ची सेवा करून घेणारी असतात,' असे प्रसिद्ध लेखक व. पु. काळे यांनी म्हटले आहे आणि ते येथे तंतोतंत लागू होते. एखादी संधी निर्माण होते, तेव्हा ज्या नेत्याच्या पखाली वहायल्या त्याच नेत्याचे कुटुंबीय किंवा एखादा बाहेरून आलेला नेता ती संधी हिरावून घेतो. 'पक्षाच्या भल्या'साठी एवढा त्याग करण्याचा सल्ला या कार्यकर्त्याला दिला जातो. या सर्वसामान्य कार्यकर्त्यांसाठी ग. दि. माडगुळकर यांनी लिहिलेल्या गाण्याच्या या ओळी लागू पडतात – 'लबाड जोडिती इमले–माड्या, गुणवंतांना मात्र झोपड्या'

# नवा दिवस, नवा झेंडा

कार्यकर्ते मंडळींना नम्र विनंती आहे की, दररोज प्रचाराला सुरुवात करण्यापूर्वी आपले साहेब त्याच पक्षात आहेत का, याचे अपडेट घेत जा. आपण प्रचार करण्यापूर्वी नेमका कोणत्या पक्षाचा प्रचार करणार आहोत, याचे अपडेट दर तासाला घेतले पाहिजेत. कारण, साहेब कोणत्या तासाला कोणत्या पक्षामध्ये असतील ते सांगता येत नाही. बहुतेक या निवडणुकीमध्ये बरेच लोक सकाळी एका पक्षात, दुपारी एका पक्षात आणि झोपताना तिसर्याच पक्षात असतील, अशी शक्यता वाटत आहे.

महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यामध्ये प्रत्येकी तीन पक्ष आहेत आणि शिवाय तिसरी आघाडी यांचे दरवाजे सगळ्यांसाठी खुले आहेत. नुकतीच एक चौथी आघाडीपण निर्माण झालेली आहे. ज्याला कोणाला अशा कुठल्याही टीममध्ये जायचे नाही त्यांच्यासाठी अपक्ष उभे राहण्याचा पर्यायपण खुला आहे. सकाळी 'शिवबंधन' बांधलेला नेता संध्याकाळी 'धनुष्यबाण' हातात घेतो आणि दुसर्या दिवशी 'धनुष्यबाण' खाली ठेवून 'मशाल' किंवा 'तुतारी' हातात घेऊन मिरवायला लागतो. हा सगळा थक्क करणारा प्रकार जनता पाहत आहे. बरे, शिवाय हे सगळे जे काही चाललेले आहे ते तुमची आमची सेवा करण्यासाठी सुरू आहे. कुणाचाही यात व्यक्तिगत स्वार्थ नाही किंवा पिढ्यान् पिढ्या पुरेल इतके कमवण्याची इच्छा नाही. त्यांची एक आणि एकच इच्छा आहे ती म्हणजे जनतेची सेवा करणे. जनतेच्या सेवेसाठी आसुसलेले इतके नेते ज्या देशामध्ये आहेत तो देश लवकरच सुजलाम् सुफलाम् होऊन जगामधील एक क्रमांकाची महासत्ता होणार याबद्दल काहीही शंका नाही.

प्रत्येक पक्षामध्ये गेली पाच वर्षे किमान अर्धा डझन नेते उमेदवारीच्या म्हणजेच आमदारकीच्या तयारीला लागले होते. प्रत्यक्ष निवडणुका जवळ आल्यानंतर तो पक्ष फक्त एकालाच तिकीट देऊ शकणार आहे. ज्याला तिकीट मिळाले नाही तो असंतुष्ट लगेच दुसर्या पक्षाकडून तिकीट मिळते का, याची चाचपणी करतो. त्या पक्षातून मिळत नाही असे लक्षात येताच तिसर्या, चौथ्या, पाचव्या किंवा सहाव्या पक्षातून तिकीट मिळते का, याची चाचपणी करतो आणि यापैकी काहीही शक्य झाले नाही, तर थेट बंडाचा झेंडा उभारून अपक्ष म्हणून उभा राहतो.

तत्त्वाला मुरड घालावी लागली तरी चालेल, पक्षनिष्ठा तोडली तरी चालेल; पण लोकांची सेवा करणारच हा दृढ निश्चय घेऊन असंख्य नेते निवडणुकीच्या आखाड्यामध्ये उतरत आहेत. सामान्य जनतेला वाटेल की, हे सर्व काही अचानक घडत आहे, तर तसे अजिबात नाही, हे आधी समजून घ्या. या सर्व लोकांची निवडणूक लढवण्याची तयारी पाच वर्षांपासून आहे आणि ऐन वेळेला पक्ष तिकीट नाही म्हणत असेल, तर तयारीत असलेला उमेदवार किती बरे नाराज होते असेल नाही? मग, तुमची सेवा करायची हा निश्चय करून तो या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून तिसर्याच पक्षात आणि काहीच नाही, तर अपक्ष म्हणून उभा राहतो. त्यामुळे कार्यकर्त्यांना आमची विनंती आहे की, सकाळी प्रचाराला लागण्यापूर्वी साहेब नेमके कोणत्या पक्षात आहेत, याची माहिती करून घ्या आणि मगच प्रचाराला लागा. अन्यथा आपण वेगळेच चिन्ह घेऊन मिरवत आहोत आणि साहेब वेगळेच चिन्ह आणि तिकीट घेऊन आले आहेत, असे झाले, तर सगळा गोंधळ उडेल.

## चवीला कडू असलेले हे पदार्थ आहेत फायदेशीर

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक**

आपण आहारात घेत असलेल्या अनेक गोष्टींची कदाचित चव चांगली नसते मात्र, त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे असू शकतात. अनेकजण कडू फळे, भाज्या, पदार्थ खाण्यास तयार नसतात, मात्र त्यांच्यापासून मिळणार्या फायद्यांचाही विचार करणं गरजेचं आहे. आज ५ कडू पदार्थांबद्दल सांगणार आहोत जे आरोग्यासाठी वरदान आहेत. तर जाणून घेऊयात कोणते आहेत ते पदार्थ

**मेथीचे दाणे**– मेथीचे दाणे हे एक लहान बियाणे आहे जे अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेले आहे. हे खनिजे, जीवनसत्त्वे फायबरने समृद्ध आहे. मेथीचे दाणे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास, कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतात. मेथीचे दाणे भाज्या, मसूर किंवा सूपमध्ये वापरता येतात. तुम्ही मेथीच्या दाण्यांची पावडरही बनवून पाण्यात मिसळून प्या.

कारला ही एक कडू भाजी आहे जी अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेली आहे. कारले रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास, वजन कमी करण्यास आणि दृष्टी सुधारण्यास मदत करते. कारल्याचा वापर भाज्या, सूप किंवा ज्यूसमध्ये करता येतो. तुम्ही कारल्याचं लोणचंही बनवू शकता.

**पालेभाज्या**– पालेभाज्या पालकसारख्या काही कडू किंवा तुरट चव असलेल्या अनेक पालेभाज्या आहेत. पण त्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. त्यात असलेले कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांसारख्या पोषक तत्वांचा आरोग्याला अनेक प्रकारे फायदा होतो.

**कडुलिंब**– कडुलिंब एक असे झाड आहे ज्याचा प्रत्येक भाग औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. कडुलिंबाची पाने, साल, बिया आणि फळे हे सर्व आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. कडुनिंबाचा उपयोग त्वचा रोग, दंत समस्या, मधुमेह आणि इतर अनेक आजारांवर केला जातो. तुम्ही कडुलिंबाच्या पानांचा उष्टा पिऊ शकता किंवा कडुलिंबाचे तेल वापरू शकता.

**ग्रीन टी**– ग्रीन टीची चव कडू असली तरी अनेक लोकांना ती आवडत नाही. पण ते प्यायल्याने आरोग्याला एक नाही तर अनेक फायदे होतात. याच कारणामुळं अलिकडे बरेच लोक तुम्हाला दुधासह गोड चहाऐवजी ग्रीन टी पिताना दिसतात. ग्रीन टी वजन कमी करण्यासाठी खूप उपयुक्त असल्याचे सिद्ध होते.

कडू पदार्थ आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. जर तुम्हाला या

# डाळिंबातील मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी ह्या तीन पद्धती

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

मर रोगाची लक्षणे पाहिल्यावर सर्वप्रथम त्याचे कारण बुरशीजन्य सेराटोसाइटीस/फ्युजॅरीयम इ. रोगजनकांमुळे उद्भवू शकते का ते शोधा. पाने पिवळसरपणाच्या पहिल्या/सुरुवातीच्या लक्षणांवर मर ओळखा.

प्रथम लक्षणे दिसताच बाधित शाखेची मुळे तपासा व काढून उभी चिरा. जर मुळामध्ये गर्द पिवळ्या/तपकिरी/राखाडी रंगाची वाढ दिसली आणि अल्कोहोलिक/फळांचा वास आला तर त्यातील लक्षणे सेराटोसिस्टीस बुरशीमुळे होणाऱ्या मर रोगाची आहेत असे समजावे.

कधीकधी, इतर मूळ कुज करणाऱ्या बुरशी जसे की फूसॅरीयम, रायझोक्टोनिया, स्क्लेरोशियम किंवा फायटोफोथोरा देखील विल्टशी संबंधित असल्याचे आढळले आहे.

विश्रांतीच्या कालावधीत, किंवा पीक नियमनच्या सुरुवातीच्या टप्प्यावर काढणीनंतर लगेचच वाळलेल्या झाडांच्या सभोवतालच्या निरोगी रोपांसाठी आळवणी (ड्रेंचिंग) किंवा जिथे नुकतीच सुरुवात होईल अश्या ठिकाणी ड्रेंचिंगला प्राधान्य द्या.

ड्रेंचिंगच्या एक दिवस आधी, जमिनीत व्यवस्थित पाणी द्यावे. पुढील दिवशी खाली दिलेल्या

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

पद्धतींपैकी कोणत्याही एका पद्धतीने ड्रेंचिंग करा. उत्तम परिणामांसाठी ड्रेंचिंगनंतर २–३ दिवसांनी पाणी देऊ नका.

सेराटोसिस्टीस, फूसॅरीयम, राइझोक्टोनिया, स्क्लेरोशियम एसपीपी होणाऱ्या मर व्यवस्थापनासाठी खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीचा अवलंब करावा.

पद्धत पहिली

पहिली ड्रेंचिंग प्रोपिकोनाझोल २५% इ सी २ मिली प्रती लिटर + क्लोरपायरीफॉस २०% ई सी २ मिली प्रती लिटर किंवा थायोमिथोक्झाम २५% ब्ल्यु जी १–१.५ ग्रॅम प्रती लिटर ने करावी. (झाडाच्या वयाप्रमाणे ५ ते १० लिटर पाणी प्रती झाड वापरावे)

पहिल्या ड्रेंचिंगच्या ३० दिवसानंतर दुसरी ड्रेंचिंग ॲस्परजिलस नायजर (ए एन २७) बुरशी ५ ग्रॅम २ किलो शेणखतामध्ये मिसळून प्रती झाड टाका.

दुसऱ्या ड्रेंचिंगच्या ३० दिवसानंतर तिसरी ड्रेंचिंग आर्बस्क्युलर मायकोरायझा बुरशी (ए एम एफ) (राईझोफॅगस इंरेगुल्यारीस/ग्लोमस इंट्रॉडॅलिसिस) हे २५ ग्रॅम ही २ किलो शेणखतामध्ये मिसळून प्रती झाड टाका.

पद्धत दूसरी

प्रोपिकोनाझोल २५% इ सी २ मिली प्रती लिटर + क्लोरोपायरीफोस २०% इ सी २ मिली प्रती लिटर २० दिवसांच्या अंतराने ३ वेळा ड्रेंचिंग करावे. (झाडाच्या वयाप्रमाणे ५ ते १० लिटर पाणी प्रती झाड वापरावे).

पद्धत तिसरी

पहिली व तिसरी ड्रेंचिंग फोसेटिल ए एल ८०% डब्ल्यू पी ६ ग्रॅम प्रती झाड आणि दुसरी व चौथी ड्रेंचिंग टेब्यूकोनाझोल २५.९% डब्ल्यू/डब्ल्यू ई सी ३ मिली प्रती झाड (झाडाच्या वयाप्रमाणे ५ ते १० लिटर पाणी प्रती झाड वापरावे) याप्रमाणे २० दिवसांच्या अंतराने करावी.

मर रोग जर फायटॉपथोरा बुरशीमुळे झाला असेल तर मेटालॅक्झील ८% + मॅनकोझेब ६४% डब्ल्यू पी २–२.५ ग्रॅम प्रती लिटर याप्रमाणे ड्रेंचिंग करावे.

वाळलेल्या (आंशिक किंवा पूर्ण) प्रभावित झाडांवर उपचार: प्रभावित झाडे काढून टाका आणि उपटलेल्या झाडांवरील प्रादुर्भित माती निरोगी रोपांवर न पसरवता काळजीपूर्वक नष्ट करा/विल्हेवाट लावा.

पाऊस नसताना काढलेल्या झाडाजवळील मातीला व्यवस्थित पाणी द्या व ६ आठवडे उष्ण महिन्यांत पारदर्शक रेखीय लो–डेन्सिटी पॉलीथिलीन (डडउझ्झए) ५०–१०० मायक्रॉन जाडीच्या प्लास्टिकने झाकून ठेवा. नंतर शिफारस केलेल्या बायो फॉर्म्युलेशनसह नवीन रोपे लावली जाऊ शकतात.

महत्वाचे

ड्रेंचिंग विश्रांती काळात किंवा हंगामातील बहार नियोजनाच्या सुरूवातीला करावी.

शॉट होल बोररचा प्रादुर्भाव असेल तर क्लोरोपायरीफोस २०% इ सी २ मिली प्रती लिटर वरील ड्रेंचिंगसोबत घेतले जाऊ शकते.

झाडाला ड्रेंचिंग करतांना, रोगग्रस्त झाड आणि जेथे रोगग्रस्त माती पसरलेली असेल अशी सभोवतालची ४–५ झाडांनाही ड्रेंचिंग करावी.

**राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर**

# जिल्ह्यात शुक्रवारी १५ उमेदवारांचे नामांकन अर्ज दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत नामांकन अर्ज दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी १५ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. अमरावती –१ , बडनेरा – २, अचलपूर – १, मेळघाट – २, मोर्शी – १, तिवसा – २, दर्यापूर – ३, धामणगाव रेल्वे – ३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले.३६ धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात निलम देविदासजी रंगारकर – देश जनहित पार्टी, अक्षयकुमार नारायण गुडधे – आंबेडकरवादी रिपब्लीकन पार्टी, प्रताप अरूणराव अडसड – भारतीय जनता पाटी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.३७ बडनेरा विधानसभा मतदारसंघात राहुल नाना काजळे – अपक्ष, ड. राजू बक्षी जामनेरकर – अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.३८ अमरावती

विधानसभा मतदारसंघात अनुष्का विजय बेलोरकर – अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.३९ तिवसा विधानसभा मतदारसंघात कमलसिंह विजयसिंह चितोडिया – अपक्ष, प्रदिप गंगाधर महाजन – अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.४० दर्यापूर विधानसभा मतदारसंघात ड. विद्यासागर गंगारामजी वानखडे – बहुजन समाज पार्टी, संजय हिरामणजी आठवले – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शरद जानराव आठवले – अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.४१ मेळघाट विधानसभा मतदारसंघात महेंद्र किशोर पटेल – अपक्ष, श्यामकुमार कृपाराम पटोरकर – अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.४२ अचलपूर विधानसभा मतदारसंघात प्रविण वसंतराव तायडे – भारतीय जनता पक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.४३ मोर्शी विधानसभा मतदारसंघात श्रीधर प्रभाकरराव सोलव – भारतीय जनता पक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# घोळ संपेना! मविआचा नवा फॉर्म्युला, तिघांना प्रत्येकी ९० जागा; ६ जागांवरील तिढा कायम

## १८ जागा मित्र पक्षांना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २६ मुंबई –** महाविकास आघाडीत सुरू असलेला वाद शुक्रवारीही शमला नाही. बुधवारी तीनही पक्षांना प्रत्येकी ८५ जागांच्या वाटपाची घोषणा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी राहिलेल्या जागांचा वाद संपेल, अशी अपेक्षा होती.

मात्र, ६ जागांवरील तिढा कायम आहे. एकीकडे हा घोळ सुरू असताना तिकडे दिल्लीत काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी शुक्रवारी मविआतील ९०-९०-९० चा नव्या फॉर्म्युल्याची घोषणा केली. तीन पक्ष मिळून २७० जागा लढवणार असून उरलेल्या १८ जागा लहान मित्र पक्षांना देऊन त्यांचे समाधान केले जाईल, असे थोरात यांनी सांगितले.

काँग्रेस, उद्धवसेना आणि शरद पवार गट या पक्षातील मोठ्या नेत्यांच्या भेटीगाठी सुरूच आहेत.

अशातच उद्धव सेनेने परस्पर उमेदवारांना एबी फॉर्म दिल्याने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ठाकरेंना पत्र लिहून नाराजी व्यक्त केल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, ज्या जागांवर मविआत वाद आहे तिथे मैत्रीपूर्ण लढत होणार अशी चर्चा होती.

मात्र काँग्रेस नेते पटोले आणि थोरात यांनी ही चर्चा फेटाळली. आम्ही आघाडी म्हणूनच लढणार असल्याचे थोरात यांनी सांगितले.

**काही जागांची अदलाबदल होण्याचे संकेत**

एकीकडे काँग्रेसचे नेते मातोश्रीवर जात असताना शुक्रवारी उद्धव सेनेचे नेते संजय राऊत यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान इथे शरद पवारांची भेट घेतली.

या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना उद्धव सेनेते जाहीर केलेल्या उमेदवार यादीत थोडा बदल होऊ शकतो, नावात किंवा जागेत बदल होऊ शकतो असे सांगत काँग्रेस -राष्ट्रवादी आणि आमच्यात एक-दोन जागांवर पुन्हा चर्चा होऊ शकतो, असे राऊत म्हणाले.

काही जागांची अदलाबदल होईल, काँग्रेस १०० च्या वर जागा लढवेल, असे विजय वड्डेटीवार यांनी सांगितले.

**कोणत्या जागांवर तिढा आणि कशासाठी?**

वर्सोवा, भायखळा, रामटेक, परांडा, श्रीगोंदा, सांगोला या जागांवरून वाद आहे.

वर्सोवा व भायखळ्याची जागा काँग्रेसला मिळावी यासाठी मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी उद्धव ठाकरेंची भेट घेतली होती.

रामटेकबाबत काँग्रेसचा आग्रह कायम आहे. उद्धवसेनेने तेथे विशाल बरबटे यांना उमेदवारी दिली आहे. तेथे माजी मंत्री राजेंद्र मुळीक यांना निवडणूक लढवायची आहे.

### पटोलेंचे पत्र आणि ठाकरेंची नाराजी

मविआत ज्या जागांवर तिढा कायम आहे अशा जागांवर उद्धव सेनेने परस्पर उमेदवार जाहीर करून एबी फॉर्मही दिल्याने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नाराजी व्यक्त करणारे पत्र उद्धव ठाकरेंना लिहिले आहे. मात्र, पटोले यांच्या या पत्रामुळे उद्धव ठाकरे नाराज असल्याचे समजते.

त्यामुळे वादाच्या जागांबाबत चर्चा करण्यासाठी मातोश्रीवर येणाऱ्या काँग्रेस नेत्यांना उद्धव यांच्या नाराजीचा सामना करावा लागत असल्याचे समजते. उद्धव ठाकरे हे काही जागा सोडायला आधी तयार झालेही होते, मात्र पटोले यांच्या या पत्रानंतर ते आता जागा न सोडण्यावर ठाम असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री फडणवीसांकडे केवळ २३,५०० रुपयांची कॅश

## एकूण सव्वा पाच कोटींची संपत्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ नागपूर –** दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांनी दाखल केलेल्या शपथपत्रातील नोंदीनुसार सद्यस्थितीत त्यांच्या एकट्याच्या नावावर सुमारे सव्वा पाच कोटींची संपत्ती आहे. मागील पाच वर्षांत उपमुख्यमंत्र्यांची संपत्ती ही २३ टक्क्यांनी वाढली आहे. प्रामुख्याने जमिनींच्या बाजारमूल्यात गेल्या ५ वर्षांत झालेल्या वाढीमुळे अचल संपत्तीत वाढ झाली आहे.



२०१९ साली उपमुख्यमंत्र्यांकडे वैयक्तिकरीत्या ४५ लाख ९४ हजार ६३४ रुपयांची चल संपत्ती व ३ कोटी ७८ लाख २९ हजार रुपयांची अचल संपत्ती होती. एकूण संपत्तीचा आकडा हा ४ कोटी २४ लाख २३ हजार ६३४ इतका होता. पाच वर्षांत त्यांच्या संपत्तीत १ कोटी ८० हजार २३३ रुपयांची वाढ झाली आहे. त्यांच्याकडे सद्यस्थितीत ५६ लाख ०७ हजार ८६७ रुपयांची चल तर ४ कोटी ६८ लाख ९६ हजार रुपयांची अचल संपत्ती आहे.

त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या नावावर २०१९ साली ४ कोटी ३८ लाख ९७ हजार ७४१ रुपयांची संपत्ती होती. ती आता वाढून ७ कोटी ९२ लाख २१ हजार ७४८ इतकी झाली आहे. त्यांच्या संपत्तीत ८०.४७ टक्क्यांची वाढ झाली आहे. त्यांच्या नावावर ६ कोटी ९६ लाख ९२ हजार ७४८ रुपयांची चल तर ९५ लाख २९ हजारांची अचल संपत्ती आहे. फडणवीस यांनी अमृता फडणवीस यांच्याकडूनच ६२ लाखांचे कर्ज घेतल्याचे शपथपत्रात नमूद केले आहे.

**न्यायालयात चार प्रलंबित प्रकरणे** फडणवीस यांनी शपथपत्रात चार प्रलंबित प्रकरणांचा उल्लेख केला आहे. त्यांच्याविरूद्ध एकही गुन्हा (एफआयआर) दाखल नाही.

### फडणवीसांपेक्षा पत्नीची वार्षिक मिळकत अधिक

देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा व्यवसाय शेती व समाजसेवा हा दाखविला आहे. त्यांची वार्षिक मिळकत ३८ लाख ७३ हजार ५६३ रुपये इतकी होती. तर त्यांच्यापेक्षा त्यांच्या पत्नी अमृता यांची वार्षिक मिळकत अधिक आहे. २०२३-२४ मध्ये अमृता यांची वार्षिक मिळकत ७९ लाख ३० हजार ४०२ इतकी होती. वेतन, शेअर्समधील कॅपिटल गेन, डिव्हिडेंट इत्यादींचा त्यात समावेश होता.

# निवडणूक कालावधीत ओपिनियन आणि एक्झिट पोलला प्रतिबंध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती–** भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मुंबई

शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक निकालांचे अंदाज १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी सात वाजेपासून ते २० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही प्रकारच्या एक्झिट पोलचे आयोजन करणे, कोणत्याही माध्यमांद्वारे प्रकाशन अथवा प्रसारण करण्यास प्रतिबंध लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे मतदान संपण्याच्या आधी ४८ तासाच्या कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल) अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असेही निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

# महायुती सर्वाधिक मताधिक्याने विजयी होईल पूर्ण राज्यात भगवा फडकेल - अमृता फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ नागपूर –** देवेंद्र फडणवीस हे विधासभा निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस या देखील त्यांच्या सोबत होत्या. यावेळी त्यांनी संवाद साधला. 'सलग सहाव्यांना देवेंद्र फडणवीस हे लोकसेवेसाठी आपला उमेदवारी अर्ज भरत आहे. त्यामुळे खूप आनंद होत आहे. त्यामुळे त्यांना खूप शुभकामना ',अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी दिली.

राज्यात आता भगवा फडकणार आहे. नागपूरमधील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आणि नागपुरकरांमध्ये मोठा जल्लोष आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीनंतर भाजप प्रगतीचं राजकारण घेऊन परत फुलणार आहे, असे म्हणत अमृता फडणवीस यांनी भाजपच्या विजयावर भाष्य केले. तर राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार येणार असा विश्वासही अमृता फडणवीस यांनी व्यक्त केला. त्या पुढे असेही म्हणाल्या की, महायुती सर्वाधिक मताधिक्याने विजयी होईल. पूर्णपणे राज्यात भगवा फडकेल, असेही देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी दावा केला.

# राज्यातील सर्वात लहान मतदान केंद्रपिली केंद्रावर केवळ सात मतदार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती –** राज्यात सर्वात कमी मतदार असलेले मतदान केंद्र मेळघाटचे चिखलदरा तालुक्यातील पिली ठरले आहे. या केंद्रावर केवळ सात मतदार आहेत. त्यानंतर पस्तलई मतदान केंद्रावर १३ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

विधानसभा निवडणुकीत यंत्रणा कामाला लागली आहे. मेळघाट विधानसभा मतदारसंघात एकूण ३५६ मतदान केंद्रांमध्ये सर्वात कमी मतदार असलेली पिली व पस्तलई ही दोन केंद्रे आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पात या गावांचे पुनर्वसन झाले, परंतु तीन परिवारांनी नकार दिल्याने ते तेथेच वास्तव्याला आहेत. परिणाम हे सर्वात कमी मतदार असलेले मतदान केंद्र ठरले आहे. त्यांच्या मतदानाकरितादोन स्वतंत्र पथके देण्यात आली आहेत. धारणी तालुक्यातील सहा गावांनी लोकसभा निवडणुकीत

टाकलेला बहिष्कार पाहता, यंदा प्रशासनाने मनधरणी केल्यानंतर तेथे मतदान होण्याची शक्यता आहे.

(कलर बॉक्स)सहा गावांनी टाकला होता बहिष्कारधारणी तालुक्यात रंगुबेली ग्रामपंचायत अंतर्गत रंगुबेली, कुंड, धोदरा, खामदा, किन्हीखेडा, खोपमार ही गावे आहेत. या गावांमध्ये वीज, शुद्ध पाणी, पक्के रस्ते, आरोग्य सेवा नाही. कोणी आजारी पडले, तर त्याला खासगी दवाखान्यातच न्यावे लागते. एकही वाहन जाऊ शकत नसल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

### लोकसभेत २३ टक्के मतदान

पिली व पस्तलई मतदान केंद्रांवर सात आणि १३ मतदाते आहेत. त्यापैकी केवळ पाच पुरुष, दोन महिला असे एकूण सात मतदारांनी लोकसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावला होता, हे विशेष.

# थंडीची चाहूल, रात्रीचा पारा घसरला

## वातावरणात बदल, विदर्भात हलक्या पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती** ऑक्टोबर हीटचा दणका सहन करता-करता शेवटच्या आठवड्यात पारा घसरल्याने थंडीची चाहूल जाणवत आहे. परतीच्या पावसाने रजा घेतल्याने वातावरणात बदल घडला आहे. मात्र राज्याच्या टोकावर चक्रीवादळाचा प्रभाव बघता पूर्व विदर्भात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. बच्चे कंपनी व ज्येष्ठांना उबदार कपड्यांची गरज वाढली आहे.

दिवाळीनंतर नोव्हेंबर महिन्यात थंडी जोर

धरण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. शक्यतो १५ नोव्हेंबरपासून थंडी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. गुलाबी थंडीची चाहूल जाणवत आहे. सकाळी किंवा पहाटे फिरणाऱ्यांची संख्या वाढत आहे.दुपारच्या वेळेला तापमान किंचित वाढत असून ऊन चटका देणारे वाटते. चार वाजल्यानंतर मात्र ऊन कमी होऊन सायंकाळी ६ वाजल्यानंतर थोडीशी थंडी जाणवायला लागली आहे.

# जिल्ह्यामधील ३० हजार निरक्षरांपैकी २५३१६ साक्षर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–** नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्यात शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये ३० हजार ५५६ इतक्या निरक्षरांची नोंद झाली होती. त्यापैकी २५ हजार ५८२ निरक्षरांना साक्षर करण्यासाठी त्यांची परीक्षा घेण्यात आली. यात २५ हजार ३१६ निरक्षर उत्तीर्ण होऊन नवसाक्षर झाले आहेत. यंदा मात्र ११ हजार ५५६ निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट शिक्षण विभागाला प्राप्त झाले आहे. या अभियानांतर्गत या निरक्षरांना साक्षरतेचे धडे देण्यात येणार आहेत.

शासनाकडून सन २०२२ ते २०२७ या पाच वर्षात नवभारत साक्षरता कार्यक्रम राज्यभर राबवण्यात येत आहे. त्यामुळे जिल्हा स्तरावर याची अंमलबजावणी करत १५ वर्षांवरील सर्व निरक्षरांना साक्षर बनवण्यासाठी शिक्षण विभागाकडून अभियान राबवले जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील शिफारशीनुसार व संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येयानुसार २०३० पर्यंत सर्व तरुण, प्रौढ पुरुष, महिलांना शंभर टक्के साक्षर करून त्यांना संख्याज्ञान होणे अपेक्षित आहे. त्यामुळे आता प्रौढ शिक्षण ऐवजी सर्वांसाठी शिक्षण हा उपक्रम राबवला जात आहे. शाळांमार्फत लाभार्थी निश्चित करून त्यांना स्वयंसेवकांमार्फत साक्षरतेचे धडे दिले जात आहेत.

# दिवाळीच्या तोंडावर ग्रामीण अर्थव्यवस्था खिळखिळी

## दुकाने सजली मात्र ग्राहक फिरकेना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६तिवसा–** प्रकाशाचे पर्व अर्थात दिवाळी उत्साहाचा सण सर्वांच्याच आवडीचा आहे. सण म्हटला की उत्सव व त्यात खरेदी ठरलीच असते. संभाव्य खरेदी लक्षात घेऊन बाजारपेठा व्यापाऱ्यांनी सजविल्या खऱ्या, मात्र सर्वसामान्य ग्राहकांच्या हातात पैसा नसल्याने बाजारपेठेत दम दिसत नाही. ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. हंगाम हातात आला; मात्र आधारभूत केंद्र बंद असल्याने विक्री होऊ शकली नाही. त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेला शेतकरी मजूर, हमाल,आदी सर्व घटक रिकामे आहेत.त्यामुळे बाजारपेठेत उत्साह नाही.शहर व ग्रामीण भागात अर्थव्यवस्थेच्या विषयात विरोधात भूमिका आहे. शहरात दररोज पैशाची उलाढाल आहे; मात्र ग्रामीण भागात हंगामी स्वरुपाची व शेतीवर निर्धारित

अर्थव्यवस्था शांत आहे. त्यामुळे - बाजारपेठेत सण, उत्सव असूनही - त्रिवार शांतता आहे. दिवाळीच्या तोंडावर व्यापाऱ्यांनी दरवर्षीचा अंदाज घेत खरेदी आटोपली. आठवडाभरावर दिवाळीचा सण येऊन ठेपला, मात्र दुकानात अर्थात बाजारपेठेत ग्राहक फिरकता फिरकेना, अशी अवस्था झाली आहे. गरजेपुरताच हंगाम खासगीत कमी रुपयात विकून तात्पुरती गरज भागवण्याची धडपड ग्रामीण जनतेत दिसत आहे.दिवाळीच्या पाच दिवसांत हा उत्साह टिकून राहील. त्यानंतर पुन्हा रोजचीच दिनचर्या सुरू होईल. निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे मंडई उत्सवावरही विरजण पडल्याचे दिसत आहे.

### शहराकडे खरेदीचा कल

गावखेड्यात मोजक्या ग्राहकांकडे सुबत्ता असली तरी त्यांचा कल गावात खरेदी करण्यापेक्षा शहराकडे वाढलेला आहे. तात्पुरती कमी खर्चाची खरेदी गावच्या दुकानातून तर मोठी खरेदी शहरातील दुकानातून करण्याची मानसिकता बळावली आहे.-

# शेतकऱ्यांनी फळपिक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती** : जिल्ह्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षासाठी राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. जिल्ह्यात आंबिया बहार २०२४ मध्ये संत्रा, मोसंबी, केळी, पपई या चार फळपिकासाठी अधिसुचित क्षेत्रामध्ये योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेत शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अवेळी, जास्त पाऊस, कमी, जास्त तापमान, वेगाचा वारा, गारपिट, जास्त पाऊस व आर्द्रता, दैनंदिन कमी तापमान या हवामान धोक्यांपासून य योजनेंतर्गत संरक्षण दिले जाते. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ही योजना ऐच्छिक आहे. सर्वसाधारपणे महसूल मंडळात फळ पिकाखाली २० हेक्टर किंवा त्याहून अधिक उत्पादनक्षम क्षेत्र असलेल्या महसूल मंडळांना फळपिकासाठी अधिसुचित करण्यात येवून त्या ठिकाणी ही योजना राबविण्यात येते. जिल्ह्यात सदर योजना युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमीटेड, १०३, पहिला माळा एमएआयडीसी, आकृती स्टार, सेंट्रल रोड, अंधेरी पूर्व, मुंबई, ४०००९३, टोल फ्री क्र. १८००२२४०३०, १८००२००४०३०, ई-मेल लेपींरलीींपिळींशींरश्रीो.लेा च्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात समाविष्ट फळपिके व पिकनिहाय प्रती हेक्टर विमा संरक्षित रक्कम आणि शेतकऱ्याने भरावयाचा विमा हप्ता पुढीलप्रमाणे आहे. संत्रा पिकामध्ये प्रति हेक्टर विमा संरक्षित १ लाख तर गारपीट ३३ हजार आहे. शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता प्रती हेक्टर ५ हजार ते ८ हजार ५०० तर गारपीट १६५० ते २८०५ रूपये आहे. मोसंबी पिकासाठी नियमित हवामान धोकेमध्ये १ लाख, तर गारपीट ३३ हजार, शेतकऱ्यांनी भरावयाचे विमा

हप्ता ५ हजार, तर गारपिटी साठी १६५० प्रति हेक्टर आहे. केळी १ लाख ७० हजार तर गारपीट ५७ हजार, शेतकऱ्यांनी भरावयाचे विमा हप्ता ८ हजार ५००, तर प्रति हेक्टर २८५० रूपये आहे. पपई पिकासाठी ४० हजार, तर गारपीट १३ हजार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी भरावयाचे विमा हप्ता २ हजार तर गारपिटीसाठी प्रति हेक्टर ६५० आहे.

योजनेत भाग घेण्यासाठी संत्रा पिकासाठी अंतिम दि. ३० नोव्हेंबर, मोसंबीसाठी दि. ३१ ऑक्टोबर, केळीसाठी दि. ३१ ऑक्टोबर, पपईसाठी दि. ३१ ऑक्टोबर आहे.सदर योजना अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांसाठी आहे. योजना कर्जदार, तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. योजनेत खातेदाराचे व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारा नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. केंद्र शासनाने त्यांचे विमा हप्ता अनुदान ३० टक्के दरापर्यंत मर्यादित केले आहे. त्यामुळे ३० टक्के वरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी यांनी स्विकारणे क्रमप्राप्त आहे. योजनेंतर्गत ३० ते ३५ टक्के पर्यंतचे अतिरिक्त ५ टक्के विमा हप्ता दायित्व राज्य शासनाने स्विकारले असून ३५ टक्के वरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी यांनी प्रत्येकी ५० टक्के याप्रमाणे भरावयाचे आहे. योजनेत प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण वगळता उर्वरित विभागासाठी कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठेची मर्यादा आहे. तसेच जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही सर्व फळपिके व दोन्ही हंगाम, मिळुन प्रति शेतकरी ४ हेक्टर मर्यादेपर्यंत राहणार आहे. अधिसूचित फळपिकांपैकी एका फळपिकासाठी एका वर्षात क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहरापैकी कोणत्याही एकाच हंगामासाठी विमा संरक्षणासाठी अर्ज करता येणार आहे. फळपिक विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यानी ई-पिक पाहणी करणे बंधनकारक आहे.

विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतकऱ्यांचे बँक खाते आधार आधारीत पेमेंटसाठी लिंक असावे. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षण लागू राहणार आहे. यासाठी संत्रा आणि मोसंबीसाठी फळपिकांचे वय ३ वर्षे आवश्यक आहे. याबाबत अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी ारहरीरीहींीर.सेीं.ळप या संकेतस्थळावरील दि. १२ जुन २०२४ रोजीचा शासन निर्णय पहावा. तसेच संबंधित विमा कंपनी, तालुका कृषि अधिकारी कार्यालयासाठी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# बारावीचे बुधवारपर्यंत, दहावीच्या परीक्षा अर्जासाठी ५ नोव्हेंबरची मुदत, विभागीय शिक्षण मंडळाची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती** येत्या फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या दहावी, बारावीच्या परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली. बारावीसाठी बुधवार ३० ऑक्टोबर, तर दहावीसाठी ५ नोव्हेंबर ही अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. शाळा आणि महाविद्यालयांच्या माध्यमातून हे अर्ज भरून घेतले जात आहेत. त्यामुळे सध्या प्रत्येक शाळा, महाविद्यालयात विविध विषयांच्या असाइनमेंटचे अहवाल सादर करण्यासह परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय यंत्रणेने स्वतंत्र वेळापत्रक न तयार करून दिले असून, त्यानुसार त्या-त्या

शाळा महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना

योग्य त्या सूचना निर्गमित केल्या आहेत. अर्ज भरण्याच्या दोन्ही तारखा विनाविलंब शुल्काशिवायच्या आहेत. परंतु जे विद्यार्थी या वेळेत परीक्षा अर्ज भरू शकणार नाहीत, त्यांना विलंब शुल्कासह अर्ज भरून देण्याची मुभा देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यक्षेत्रात पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या पाचही जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालये आणि दहावीच्या सर्व शाळांना मंडळातर्फे योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. दहावी, बारावीचे परीक्षा अर्ज ऑनलाइन भरावयाचे आहेत. या परीक्षेच्या तारखा येत्या काही दिवसात होण्याची शक्यता आहे

# 'उर्ध्व वर्धा'तून रब्बी सिंचनासाठी पाच पाणीपाळ्या प्रस्तावित शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती-** उर्ध्व वर्धा प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी पाणीसाठा उपलब्ध असून पाच पाणी पाळ्या देण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी लाभक्षेत्रातील शेतकरी बांधवांनी १० नोव्हेंबरपूर्वी संबंधित शाखा कार्यालयास अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.उजवा मुख्य कालव्याच्या आरंभापासून ९५.५० किमीपर्यंत व डावा मुख्य कालव्याच्या ४२.४० किमीपर्यंतच्या लाभक्षेत्रातील सर्व वितरिका, जलाशयावरील अधिसूचित नदीनाल्यांवरील लाभधारकांना रब्बी हंगामासाठी पाणी देण्यात येईल. वितरण व्यवस्थेद्वारे जिथे सुलभपणे पाणी जाऊ शकते तिथपर्यंत कालवा संचलन कार्यक्रमानुसार 'पुच्छ भागाकडून ते मुखाकडे' (टेल टु हेड) या तत्त्वानुसार सिंचन होणे आवश्यक आहे.नोव्हेंबर ते मार्च दरम्यान पाच वेळा पाणी मिळेलकालव्याचे प्रवाही किंवा कालव्यावरील, नदी-नाल्यांवरील मंजूर उपसा सिंचन योजनांद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यावयाचे असल्यास पाणी मागणी अर्ज नमुना क्र. ७ संबंधित शाखा कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. ते भरून १० नोव्हेंबरपर्यंत तिथेच सादर करावेत, असे आवाहन उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी केले आहे. रब्बी हंगामात नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत या कालावधीत मागणीप्रमाणे पाच पाणी पाळ्या देण्यात येतील.

लाभधारकांनी नियम पाळणे आवश्यक इच्छुक लाभधारकांनी त्यांच्याकडील थकबाकीची एक तृतीयांश व चालू हंगामाची अग्रिम पाणीपट्टी भरावी. उपसा सिंचन लाभधारकांनी नळमार्गावर पाणी मोजमाप यंत्र बसवावे. पिकांचे मागणी क्षेत्र २० आर या पटीत असावे. पाणी अर्ज मंजूर करुन घेऊनच उपसा सिंचनासाठी पाणी वापर करावा.मंजूर क्षेत्रासाठी कालव्याचे पाणी घेण्यात येणारी शेतचारी व विहिरीवरील शेतचारी यात तीन मीटरचे अंतर असावे.

लाभक्षेत्रातील कालव्यापासून ३५ मी. पर्यतच्या विहिरींच्या पाण्याने सिंचित होत असलेल्या नगदी पिकांसाठी (उदा. ऊस, कापूस, केळी व फळबाग) पाटबंधारे अधिनियमानुसार प्रवाही सिंचनाच्या मूळ दराच्या ५० टक्के दर लागू असेल.पाणीपट्टी न भरणा-या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाही. व त्यांचा पाणीपुरवठा केव्हाही बंद करण्यात येईल व थकबाकीवर शासन निर्णय नियमानुसार द.सा.द.शे. १० टक्के दरान विलंब आकारण्यात येईल.शेतचारा स्वच्छ ठेवाकालव्याचे पाणी शेतात नेण्यासाठी असलेली शेतचारी स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी लाभधारकांची आहे. शेतचारी स्वच्छतेअभावी पाणी पुरवठ्यामध्ये व्यत्यय आल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. उडाफ्याचे क्षेत्रास पाणीपुरवठा करण्यात येणार नाही व तसेच लाभधारकांनी मंजूर क्षेत्राचे मर्यादेपर्यंत कालवा व नदी-नाल्याच्या पाण्याचा वापर करावा. मंजूरीपेक्षा जादा क्षेत्र भिजविल्यास व अनधिकृतपणे पाणी घेतल्यास नियमाप्रमाणे पंचनामा करुन दंडनीय आकारणी करण्यात येईल. मंजूर न केलेल्या क्षेत्रास पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही. लाभधारकाने दिवस व रात्री पाणी घेणे बंधनकारक आहे. अडचणी असल्यास कोणत्याही प्रकारची आगाऊ सूचना न देता पाणी पाळी पत्रकात बदल करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना राहतील.थकबाकीदार लाभधारक व थकबाकीदार पाणीवापर संस्थांना पाणी देणे बंधनकारक राहणार नाही. वितरिका पाणी पाळीमध्ये पाणी चालू असताना लाभधारक वितरिकेचा दरवाजा वेळी-अवेळी कमी-जास्त प्रमाणात उघडतात. त्यामुळे त्या वितरिकेवरील चालू असलेल्या पाण्याचा विसर्ग कमी जास्त होऊन 'टेल टू हेड' सिंचनावर विपरीत परिणाम होतो व त्यामुळे त्या वितरिकावरील पिकांना संचलनाप्रमाणे पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे प्रस्तावित पाणी पाळी कालावधीत वाढ होते.रब्बी हंगाम २०२४-२५ संभाव्य पाणी पाळी नियोजनकालव्यात पाणी सोडण्याचा कालावधी दि. १५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२४ (२२ दिवस) तर कालवा बंद कालावधी ६ ते १२ डिसेंबर २०२४ राहील. दि. १३ डिसेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ कालव्यात (२२ दिवस) पाणी सोडण्यात येईल तर दि. ४ ते १० जानेवारी २०२५ कालवा बंद राहील. दि. ११ ते दि. २७ जानेवारी २०२५ (१७ दिवस) पाणी सोडण्यात येईल तर दि. २८ जानेवारी ते दि.३ फेब्रुवारी २०२५ कालवा बंद राहील. दि. ४ ते दि. २० फेब्रुवारी २०२५ (१७ दिवस) पाणी सोडण्यात येईल तर दि. २१ ते दि. २७ फेब्रुवारी २०२५ कालवा बंद राहील. दि. २८ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२५ (१६ दिवस) पाणी सोडण्यात येईल. कालव्यात एकूण ९४ दिवस पाणी सोडण्यात येईल.जर लाभधारकांनी संचलन कार्यक्रमाप्रमाणे टेल टू हेड रात्रंदिवस शेजपाळीपध्दतीने पिकांना पाणी घेतले तर संभाव्य पाणीपाळीचा कालावधी कमी होवून पाण्याचा अधिकाधिक लाभ होईल. संपूर्ण प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात शेतकऱ्यांनी कोठेही दारे स्वतः उघडून टेल टू हेड सिंचन प्रकारात अडथळा आणल्यास पाण्याचा नाश तर होतोच शिवाय पाणीपाळी कालावधी वाढतो. उर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत असलेल्या लाभधारकांनी या बाबत योग्य ते सहकार्य करावे, असे आवाहन उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले आहे.

# शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धेतून चार राज्यसंघाची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती** अमरावती येथील राज्यस्तरीय शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धेतून १४ आणि १९ वर्षे वयोगटातील मुले आणि मुलींच्या संघाची निवड करण्यात आली. निवड करण्यात आलेले संघ राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचे नेतृत्व करणार आहे.१४ वर्षे मुले राज्याच्या संघात आदित्य सावरकर, अमरावती विभाग, इंशात जांभेबर अमरावती विभाग, अर्णव गवळी छत्रपती संभाजीनगर विभाग, मयुर पाटील नाशिक विभाग, शार्दुल औताळे पुणे विभाग, राजवीर वैभव पाटील कोल्हापूर विभाग, कपिल कोल्हे नागपूर विभाग, साहिल फिरोज मुलानी कोल्हापूर विभाग, विरोचंद रमेश शिंदे छत्रपती संभाजीनगर विभाग, स्मित देवाणी मुंबई विभाग, आयुष डोळस नाशिक विभाग, सौम्या सतदेवे नागपूर विभाग, राखीव खेळाडू ओजस देवलकर, कोल्हापूर विभाग, राज कुकडे अमरावती विभाग, संस्कार गायकवाड छत्रपती संभाजी नगर विभाग, निलेश भडके छत्रपती संभाजी नगर विभाग, श्रलोक डफळे पुणे विभाग यांची निवड करण्यात आली आहे. १४ वर्षे मुलीच्या संघात वंशिका कातोरे नागपूर विभाग, स्नेहा पापडकर अमरावती विभाग, अंशू राजकुळे अमरावती विभाग, आर्या चव्हाण छत्रपती संभाजी नगर विभाग, कशिश साळुंखे मुंबई विभाग, रिचल अंभग पुणे विभाग, तनया विकास भारे पुणे विभाग, प्रिती यादव कोल्हापूर विभाग, अनुष्का शिंदे कोल्हापूर विभाग, स्वाती बबलू उईके नागपूर विभाग, सांची कदम लातूर विभाग, समृद्धी वारटे नाशिक विभाग, राखीव खेळाडू अश्लेषा डोंबाळे नाशिक विभाग,

वैदही सोनवणे अमरावती विभाग, नेत्रा कानसारा मुंबई विभाग, श्रीजा कांबळे कोल्हापूर विभाग, नंदिनी शेबे अमरावती विभाग यांची निवड करण्यात आली. १९ वर्षे मुलांच्या संघात सुजल प्रभाकर बोरकर अमरावती विभाग, शिवम बाळकृष्ण आंधळे अमरावती विभाग, दिवांशू सचिन नंदनवार नागपूर विभाग, सागर ज्ञानेश्वर किर्पण नागपूर विभाग, आशिष शिवाजी गायकवाड छत्रपती संभाजी नगर विभाग, हितेश नितीन सोनवणे नाशिक विभाग, अर्थव सुभाष माने कोल्हापूर विभाग, नंदराज संतोष मालुसरे पुणे विभाग, कुशाग्रा राजेशसिंग मुंबई विभाग, सक्षम प्रविण कुपटीकर लातूर विभाग, साहित्य राजेश जोगी नागपूर विभाग, सुरज मातादीन देवीकर अमरावती विभाग, राखीव खेळाडू अक्षय ललीत पाटे नाशिक विभाग, क्रीष्णा ईश्वर गावंडे नाशिक विभाग, ओंकार विष्णू कदम कोल्हापूर विभाग, प्रतिक विजय सिरसाट अमरावती विभाग, आदित्य संजय करचे पुणे विभाग यांची निवड करण्यात आली.

१९ वर्षे मुलीच्या संघात जानव्ही संजय बावनकुळे नागपूर विभाग, क्रिष्णा त्र्यंबक घुले नागपूर विभाग, आश्लेषा भास्कर गिरी अमरावती विभाग, हनी विनोद देशमुख अमरावती विभाग, वैभवी दिपक खैरनार नाशिक विभाग, साक्षी संजय पाटील नाशिक विभाग, खुशी संदिप दळे पुणे विभाग, रिचा संजय नवसुपे छत्रपती संभाजी नगर विभाग, शिवाणी संजय पाटील कोल्हापूर विभाग, मानसी शेखर वायकोस छत्रपती संभाजी नगर विभाग, सिद्धी विजयसिंह मोरे कोल्हापूर विभाग, मानसी सुधीर तिगोटे मुंबई विभाग, राखीव खेळाडू हेनी शैलेश लाड मुंबई विभाग, धनिष्का आनंद कावळे नागपूर विभाग, वैष्णवी संदीप वानखडे अमरावती विभाग, श्रद्धा बालाजी जगताप लातूर विभाग, अनुष्का सयाजी घाडगे पुणे विभाग यांची निवड करण्यात आली.

# लाल मातीच्या पणत्यांना ही मागणी

## आकर्षक दिवे,फॅन्सी पणत्यांनी सजली बाजारपेठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती** दिव्यांचा लखलखाट, सर्वदूर पसरलेला झगमगाट. खरेदी आणि फटाक्यांची आतषबाजी अशा दिवाळी सणाच्या उत्साहाला द्विगुणीत करणाऱ्या दिव्यांसह पणत्यांची अवधी बाजारपेठ फुलली आहे. दिवाळीशी अतूट नाते असणारे हे दिवे अमरावतीच्या बाजारात दाखल झाले आहेत. छोट्या पारंपरिक पणत्यांपासून हल्ली डिझायनर पणत्यांना मागणी आहे. २० रुपयांपासून ते २५० रुपयांपर्यंत फॅन्सी दिवे, पणत्या मिळत आहेत. यंदा २० टक्क्यांनी दरवाढ झाली असली तरी ग्राहकांच्या मागणीनुसार दरामध्ये कमी जास्त करण्यात येत असल्याचे विक्रेत्या सुनंदा काळे यांनी सांगितले आहे.

दिवाळीनिमित्त गुजरात आणि राजस्थानातील खास लाल आणि चिनी मातीतील पणत्यांसह नक्षीकाम केलेल्या दिव्यांनी बाजारपेठ उजळली आहे. तेजोमय प्रकाशाने आपले घर आणि अंगण उजळावे, यासाठी पणत्या किव्यांचे नवनवीन प्रकार बाजारपेठेत आले आहेत. पान, शंख, चौरंग, वृक्ष, स्वस्तिक अशा विविध प्रकारच्या दिव्यांसह आकर्षक रंगकाम केलेल्या पणत्यांच्या खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. पणत्या, नंदादीप, दीपमाळांनी बाजारपेठ सजली पंच असून, यंदा फॅन्सी दिवे आणि नक्षीकाम असलेल्या पणत्यांना मोठी मागणी आहे. हत्ती, मोर, शंख, कळस, वृंदावन, बैल-जोडी, मंदिर, बंगला, झोपडी, वृक्ष, मोदक, मासे, कासव असे प्रकार आहेत. वॉल हैंगिंग दिवे आणि काचेच्या दिव्यांनाही पसंती मिळत आहे.

कलर बॉक्सअसे आहेत दिव्यांचे दर लाल मातीचे छोटे दिवे पूर्वी पाच रुपयांना मिळत. परंतु, आता एका दिव्याची किंमत २० ते ५० रुपये झाली. रंगरंगोटी केलेले हे दिवे ३५ पासून पुढे, तर सजावट केलेल्या पणत्या ५० रुपयांपासून ते २५० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. तुळशी वृंदावन आकारानुसार ३० रुपयांपासून विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

# दिवाळीच्या फराळाला १० टक्के महागाईची झळ, डाळीचे दर स्थिर

## नोकरदार महिलांकडून रेडिमेड वस्तूंना पसंती : गृहिणी घरीच तयार करतात फराळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर आहे. यानिमित्ताने घराघरांत तसेच उपाहारगृह व हॉटेलात फराळ तयार करण्याची लगबग वाढली आहे. यंदा कच्च्या मालाच्या दरात वाढ झाल्याने फराळही १० टक्क्यांनी महाग असल्याची माहिती फराळ विक्रेत्यांनी दिली. दिवाळीत चिवडा, करंजी, लाडू, अनारसे, चिरोटे आदींची सर्वाधिक विक्री होत असते. यापूर्वीच वाढलेले डाळीचे दर सध्या स्थिर आहेत. परंतु, अन्य किराणा साहित्य थोडे महाग असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

दिवाळी सणानिमित्त बाजारात खरेदीला उधाण येते. आकाशकंदील, पणती, रांगोळी, नवे कपडे, गृहोपयोगी नवीन वस्तू वाहने, सोने-चांदी, दागिन्यांची खरेदी केली जाते. याशिवाय नोकरदार महिलांकडून फराळाच्या खरेदीला विशेष महत्त्व दिले जाते.दिवाळीनिमित्ताने फराळ बुकिंगला सुरुवात झाली आहे. अलीकडे फराळ तयार करण्याची कटकट व वेळेचा अभाव यामुळे बहुतांश महिलांचा कलरेडिमेड फराळ खरेदीकडे असतो.

त्यामुळे फराळ विकणाऱ्यांची संख्याही वाढत असल्याची माहिती भंडारा शहरातील फराळ विक्रेता पुरोहित यांनी दिली.

**कडधान्याचे दर दहा रुपयांनी वाढले**

किराणा व खाद्यान्न दुकानात कडधान्याच्या दरात तफावत आहे. यंदा कडधान्याच्या दरात १० ते २० रुपयांची वाढ झाली आहे. काही कडधान्यांनी शतक पार केले आहे. त्यामुळे वरण व उसळ बनविताना महिलांना हात आखडता घ्यावा लागत आहे. पातळ डाळ बनविण्याला प्राधान्य दिले जात आहे.

### साखरेचे दर ४० रुपयांवर

दिवाळीच्या तोंडावर साखरेचे दर ४० रुपयांवर पोहोचले आहेत. महिनाभरापूर्वी साखरेचे दर ३६ ते ३८ रुपये प्रति किलो होते. साखरेच्या दरात २ ते ४ रुपयांची वाढ झाली आहे. दिवाळीत साखरेचे दर याप्रमाणे राहण्याचा अंदाज शहरातील किराणा व्यावसायिक अनिल चरडे यांनी व्यक्त केला आहे.

### सध्याचे डाळीचे दर प्रतिकिलो

तूरडाळ १६० ते १८०
चनाडाळ ९० ते १००
मसूरडाळ ८० ते ९०
मूगमोगर डाळ १०० ते ११०
उडीद डाळ १२० ते १३०

### तेलाचे दरतेल प्रति दिन दर

सोयाबीन २०५०-२१५०
सूर्यफूल २००० ते २१००
शेंगदाणा २७०० ते २८५०
राईस ब्रांड २७००

# गावा गावात आ. रवी राणा यांच्या जनसंपर्क यात्रेला प्रचंड प्रतिसाद

## आपला मुलगा आपल्या दारी मुहिमेत सर्व मातृ शक्ती- पितृ शक्तीचा घेत आहे आशीर्वाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

बडनेरा विधानसभा मतदारसंघात महायुतीचे युवा स्वाभिमान पक्षाचे अधिकृत उमेदवार आमदार रवी राणा यांना आपला मुलगा आपल्या दारी, या जनसंपर्क आशीर्वाद यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्या पूर्वी रवी राणा गावा गावात प्रत्यक्ष एकूण एक घरी जाऊन सर्व मातृ शक्ती- पितृ शक्तीचा आशीर्वाद घेत आहे. गोर गरीब जनतेच्या सेवेसाठी नेहमी तत्पर रवी राणा यांना आशीर्वाद देण्यासाठी सर्व गावा गावात मातृशक्ती पितृ शक्ती व युवा वर्ग आपुलकीने पुढे येऊन स्वतः प्रचार करत आहेत.बडनेरा विधानसभा मतदारसंघात येणाऱ्यालोणटेक, मलकापूर, पांढरी आणि हातुर्णा पुनर्वसन येथे त्यांच्या आशीर्वाद यात्रेला प्रचंड प्रतिसाद पाहून विरोधकांना घाम फुटला आहे. राणा यांचे निवडणूक चिन्ह पाणा आहे. हे संपूर्ण मतदारसंघात माहीत आहे. याचा देखील प्रचार प्रत्येक गावात मातृशक्ती-पितृ शक्ती करत आहे. युवा वर्गात ही रवी राणा यांच्या बद्दल विशेष आपुलकी आहे. लोणटेक, मलकापूर, पांढरी आणि हातुर्णा पुनर्वसन येथे प्रत्येक गावकरी रवी राणा यांना आशीर्वाद देण्यासाठी पुढे येत आहे. ज्याच्या दारी गेले, तेथे मोठी गर्दी जमा होत आहे. गावा गावात एकच चर्चा केल्या जात आहे की, आमचा हक्काचा मुलगा आमचा आमदार रवी राणा नेहमी गावकऱ्यांच्या संपर्कात राहतात. त्यांच्या अडी अडचणीची रवी राणा यांना जाण आहे. आपुलकी आहे. प्रत्येक व्यक्तीचे नाव सुद्धा त्यांना मुकपाठ आहे. त्यांचा मिळून मिसळून राहण्याचा स्वभाव व सतत जनसंपर्क ठेवण्याची त्यांची सवय हे रवी राणा यांच्या साठी सर्वात जमेची बाजू आहे. असे मत गावा गावात व्यक्त केल्या जात आहे.

# आक्षेपार्ह पोस्ट टाळण्यासाठी मोबाइलच्या सेटिंग झाल्या आता 'ओन्ली ॲडमिन'

## प्रशासनाचा इशारा: आचारसंहितेचा भंग केल्यास थेट जेलची हवा




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून सोशल मीडियातील ग्रुपमधील सदस्यांकडून येणाऱ्या आक्षेपार्ह पोस्ट टाळण्यासाठी मोबाइल ग्रुपच्या सेटिंग बदलून 'ओन्ली ॲडमिन' करण्यात आल्या आहेत. आचारसंहिता भंग केल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा पोलिस तसेच निवडणूक विभागाने दिला आहे.

विधानसभा निवडणुकीत आदर्श आचारसंहिता भंग होऊ नये म्हणून प्रशासनाने नजर ठेवणे सुरू केले आहे. सोशल मीडियावर अफवा पसरवू नयेत, आचारसंहितेचा भंग होईल अथवा दोन गटांत वाद होईल, अशा पोस्ट करू नयेत, यासाठी सोशल मीडियावर व्यक्त होणाऱ्या अतिउत्साही कार्यकर्ते व नेटकऱ्यांसाठी कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू आहे. त्या अनुषंगाने सोशल मीडियावर काही निबंध घालण्यात आले आहेत. कोणत्याही उमेदवाराशी संबंधित तसेच त्याची वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक स्तरावर अवहेलना होईल, अशी आक्षेपार्ह टीका-टिप्पणी करणे, मजकूर, फोटो प्रसारित करणे अथवा आलेल्या एखाद्या पोस्टवर आपले आक्षेपार्ह मत पोस्ट करणे आणि ते पुन्हा फॉरवर्ड करणे तसेच मतदाराचे मन वळविण्यासाठी कोणत्याही धर्माच्या, लोकांच्या धार्मिक, भाषिक तसेच जातीत द्वेष पसरविणारे आक्षेपार्ह मजकूर, फोटो, व्हिडीओ (एडिट/मार्किंग) करून प्रसारित केल्यास निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संबंधितांवर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

ॲडमिनने सेटिंग बदलाव्यातसोशल मीडियावरील कोणत्याही ग्रुपवर आदर्श आचारसंहितेचा भंग होईल, अशा पोस्ट टाकल्या जाऊ नयेत, यासाठी ग्रुप ॲडमिनने सर्व ग्रुपची सेटिंग बदलून ती 'ओन्ली फॉर ॲडमिन' करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# उमेदवाराला खर्चाकरिता उघडावे लागणार स्वतंत्र बँक खाते

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

विधानसभा निवडणुकीत उमेदवारांकडूनहोणाऱ्या खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला खास निवडणुकीसाठी कुठल्याही बँकेत खाते उघडावे लागणार आहे. यासंदर्भातील निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या किमान एक दिवस आधी स्वतंत्र बँक खाते उघडावे, असे आयोगाने आदेशात म्हटले आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे निवडणुकीच्या खर्चावर प्रशासनाचे काटेकोरपणे लक्ष असणार आहे. निवडणूक उमेदवारांकडून वेळोवेळी आढावा घेतला जाणार आहे.

**खर्चासाठी हवे स्वतंत्र बँक खाते**

विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ४० लाख रुपयांपर्यंत खर्च करता येणार आहे. उमेदवारी भरण्यापूर्वी किमान एक दिवसापूर्वी बँकेत खाते उघडावे लागणार आहे.

**खाते कोणाच्या नावाचे लागणार?**

निवडणुकीमध्ये उभ्या असणाऱ्या उमेदवारांना स्वतःच्या नावाने खाते उघडावे लागणार आहे. वैयक्तिक किवा उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त नावानेही खाते उघडता येते.

**रोख खर्चावर येणार मर्यादा**

निवडणुकीमध्ये उमेदवारांना दहा हजार रुपयांपर्यंतची देय रक्कम रोख स्वरूपात देता येईल.त्यापेक्षा जास्त रक्कम मात्र धनादेश, एनएफडी, आरटीजीएसने किंवा ऑनलाइन पद्धतीने द्यावे लागेल, असे निर्देश निवडणूक आयोगाकडून देण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे लागणार आहे.

# बंदी असलेले फटाके विकाल तर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

जास्त आवाज व ज्वलनशील फटाके विक्रीवर बंदी असून असे फटाके विक्रेता विकताना आढळल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

भारत सरकारद्वारा जारी केलेल्याअधिसूचनेनुसार शहरात फटाके विक्रेत्यांनी १२५ डेसिबल (एआय) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांचे उत्पादन व विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. असे फटाके वापरण्यास बंदी आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करू नये, तसेच फटाक्याची विक्री ही फटाखा मार्केट मध्येच करण्यात यावीतसेच महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ५.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियानांतर्गत फटाके मुक्त, प्लास्टिक मुक्त, कचरा मुक्त, प्रदूषण मुक्त, व पर्यावरण पूरक ग्रीन फेस्टिव्हल उत्सव साजरा करण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# विधानसभेला वाढणार मतदानाचा टक्का; स्थानिक मुद्द्यांसह वातावरणाचाही सकारात्मक परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

लोकसभा निवडणुकीपेक्षा विधानसभा निवडणुकीत मतदारांमध्ये उत्साह दिसून येतो. ते आपल्या क्षेत्राचा आमदार निवडण्यासाठी उत्स्फूर्तपणे मतदान करतात. याशिवाय लोकसभा निवडणूक ही भरउन्हाळ्यात होते. तर विधानसभा निवडणूक ही हिवाळ्यात म्हणजे, थंडीच्या दिवसांत होत असल्याने मतदार रांगेत राहण्यासाठी त्रासत नाहीत. हे कारण असले तरी स्थानिक, मुद्दे व उमेदवाराला निवडून आणण्यासाठी मतदार हिरिरीने मतदान करतात, अशी आहे.

**निवडणूक विभाग कामाला**

मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी निवडणूक विभाग कामाला लागलेला आहे. शाळा- महाविद्यालयांमार्फत गावांमध्ये मतदानाबाबत जनजागृती केली जात आहे. विशेष म्हणजे, यामध्ये संघटना व संस्थाही काम करीत आहेत.

# ग्रामीण भागातही उत्साह बाजारपेठेत वाढली गर्दी : दिवाळी सणाच्या मुहूर्तावर घरांची रंगरंगोटी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

दिवाळीच्या सणाच्या तयारीची लगबग जोरात सुरू आहे. बाजारपेठेतील वर्दळ वाढली असून सजावट साहित्याची विक्री वाढली आहे. साहित्याच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाल्याने सर्वसामान्यांवरही बोजा वाढला आहे. असे असतानाही दिवाळीचा महाउत्सव साजरा करण्यासाठी प्रत्येकजण आपापल्या स्तरांवर प्रयत्न करताना दिसत आहे.

विशेषतः दिवाळीत घरांची साफसफाई आणि रंगरंगोटी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्य, मग ते पुरुष असो वा मुले, या कामात घरगुती उद्दिष्टे ठेवून असतात. सण जसजसा जवळ येत आहे. तस तशी साफसफाई आणि रंगरंगोटीच्या कामाला वेग आला आहे.दिवाळी सणानिमित्ताने बाजारपेठांमध्ये गर्दी वाढू लागली आहे. शहर असो की ग्रामीण भाग, सर्वत्र दीपोत्सवाची तयारी जोरात सुरू आहे. महाउत्सवाबाबत नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. त्याचबरोबर सणासुदीच्यापार्श्वभूमीवर व्यापारीही बाजारपेठांमध्ये असतात. पूर्णपणे सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. आता सुटीच्या दिवशीही दुकाने सुरूच आहेत. जेणेकरून सणासुदीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत पोहोचणाऱ्या ग्राहकांनाकोणत्याही प्रकारची समस्या किंवा निराशेचा सामना करावा लागणार नाही. सणानिमित्त दुकाने सजली आहेत. वाहनांचे पार्किंग आणि अतिक्रमण ही येथे मोठी समस्या आहे. त्यामुळे अनेकवेळा वातावरण बिघडते. सणासुदीच्या काळात गैरप्रकारांच्या तक्रारीही मोठ्या प्रमाणात वाढतात आहेत. खरेदीसाठी ग्राहकही बाजारपेठेत पोहोचू लागले आहेत. येत्या काही दिवसांत बाजारपेठांमध्ये मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. व्यापारी वर्गालाही यंदा बंपर दिवाळीची अपेक्षा आहे. दिवाळीच्या सणामुळे नागरिकांमध्ये आतापासूनच उत्साह व जल्लोष पाहायला मिळत आहे दिवाळी या सणाचे आजही महत्त्व कायम आहे. ग्रामीण भागातसुद्धा जवळपास पाच दिवस हा सण साजरा होतो.



# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे निष्ठावंत गजानन लवटे यांना मिळाला न्याय

## दर्यापूर मतदार संघातून उमेदवारी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६दर्यापूर**

महाराष्ट्र राज्य मध्ये विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजताच महाविकास आघाडी व महायुतीच्या बैठका होऊन तिकीट वाटप संदर्भात चर्चा करण्यात आल्या त्यामध्ये महाविकास आघाडी मार्फत कालपर्यंत २७० जागेचा तिढा सुटला व राहिलेल्या १८ जागेमध्ये दर्यापूर मतदार संघामध्ये वाद होता त्यामध्ये काँग्रेस व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दोन्ही नेत्यांनी त्या मतदारसंघावर दावा केला परंतु अखेर काँग्रेसचे नेते दावा मांडण्यात कमी पडले मात्र चांदुर रेल्वे हा मतदारसंघ उ भा टा ला न सुटता वीरेंद्र जगताप यांनी आपल्याकडे खेचून आणला व ते सीट काँग्रेसला जाहीर झाली त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला हा मतदारसंघ सुटला त्यातच मतदारसंघातील उमेदवार निवडताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून फार मोठी चुरस निर्माण झाली होती व अखेर निष्ठावंत अंजनगाव येथील मतदार संघातील स्थानिक उमेदवार गजानन लवटे यांना न्याय मिळवून त्यांची उमेदवारी घोषित करण्यात आली गजानन लवटे हे माजी शिवसेना शहरप्रमुख असून त्यांचा दांडगा जनसंपर्क व पूर्ण दर्यापूर मतदारसंघ पिंजून काढला प्रत्येक महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या भेटी घेऊन त्यांनी मतदारसंघावर दावा केला त्याची पावती म्हणून त्यांना अखेर उमेदवारी घोषित झाली त्याप्रसंगी एबी फॉर्म देताना दर्यापूर तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रमुख सुनील भाऊ डिके गणेशराव राजुरकर ,सुनील भाऊ बायसकार, सुनील भाऊ नांदुरकर, किशोर टाले, उमेदवार एबी फॉर्म घेताना गजानन लवटे अंजनगाव आधी दिसत आहेत.

# लोकसभेचा वचपा विधानसभेत काढणार? अडसूळांच्या अडचणी वाढणार? दर्यापुरात राणांनी दंड थोपटले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

लोकसभा निवडणुकीचे हिशोब विधानसभा निवडणुकीत चुकते करण्यासाठी आता रवी राणा पुढे सरसावले आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. त्यात अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर या राखीव मतदार संघातून अभिजीत अडसूळ यांना शिवसेना शिंदे गटाने उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र अभिजित अडसूळ यांना उमेदवारी जाहीर केल्याचा आनंद जास्त वेळा राहीला नाही. या मतदार संघात मित्र पक्षानेच अडसूळांना घेरण्याची रणनिती आखली आहे. युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा यांनी या निमित्ताने लोकसभेचे हिशोब विधानसभेला चुकते करण्यासाठी कंबर कसली आहे.

महायुतीत दर्यापुरची जागा ही शिवसेना शिंदे गटाला गेली आहे. या मतदार संघातून अभिजीत अडसूळ यांना उमेदवारीही जाहीर करण्यात आली आहे. त्याच वेळी युवा स्वाभिमान पक्षाने भाजपचे माजी आमदार रमेश बुंदिले यांना आपल्या पक्षात घेतले आहे. त्यामुळे महायुतीत इथे बंडखोरी होणार हे निश्चित आहे. तसे स्पष्ट संकेतही युवा स्वाभिमानचे प्रमुख रवी राणा यांनी दिले आहेत. लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांचा पराभव व्हावा यासाठी अडसूळ पिता पुत्राने काम केल्याचा राग रवी राणा यांच्या मनात आहे. त्यामुळे हा हिशोब विधानसभेला चुकता करण्यासाठी ते पुढे सरसावले आहेत.

या निमित्ताने रवी राणा यांनी आनंदराव अडसूळ आणि अभिजीत अडसूळ यांच्यावर टिकेची झोड उठवली आहे. आनंदराव अडसूळ आणि अभिजीत अडसूळ या पिता पुत्राने मुख्यमंत्र्यांना ब्लॅकमेल करत एबी फॉर्म आणला आहे असा आरोप त्यांनी केलाय. अभिजीत अडसूळ हे जरी महायुतीचे उमेदवार असले तरी त्यांच्या विरोधात भाजप आणि युवा स्वाभिमानचे कार्यकर्ते एकवटले आहेत. असे रवी राणा यांनी सांगितले. त्यांनी नुकताच दर्यापूरमध्ये कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. शिवाय दर्यापूरमध्ये रमेश बुंदिले हे उमेदवार असतील असेही जाहीर करून टाकले. त्यामुळे महायुतीत या मतदार संघात बंडखोरी अटळ आहे

या मेळाव्यात बोलताना रवी राणा यांनी अडसूळांवर सडकून टिका केली. मुंबईतल्या कांदिवलीतून येऊन दर्यापुरात जर कोणी इलेक्शन लढवत असेल तर हे पार्सल हे आम्हाला चालणार नाही.अशा शब्दात त्यांनी अभिजीत अडसूळ यांच्या उमेदवारीला विरोध दर्शवला आहे. निवडणुका आल्या तरी अशी काही बेडकं बाहेर यायला सुरूवात होतात. अभिजीत अडसुळांसारखं बेडुक पाच वर्षात गायब होणार आहे अशी बोचरी टिकाही त्यांनी केली. रमेश बुंदिले हे दर्यापूरचे युवा स्वाभिमानचे उमेदवार असतील. त्यांना निवडून आणणार आहे. त्यासाठी वरिष्ठांचे आशिर्वादही घेतले आहे. भाजपचे नेतेही आमच्या सोबत आहेत. त्याचाही आशिर्वाद आम्हालाच आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही आशीर्वाद दिले आहेत असे विधान रवी राणा यांनी यावेळी केले. मीडियावाल्यांनाही सांगतो, जास्त काही दाखवायचं नाही. मतदार संघाच्या विकासाचा विषय आहे. भोळ्या भाबड्या जनतेच्या भविष्याचा विषय आहे. यांना ठगणार कोणी येत असेल तर त्यांना जागा दाखवायचं काम करायचं आहे, असंही ते यावेळी म्हणाले.

# निवडणुकीच्या प्रचारात सोशल हँडलर्सची एंट्री

## विधानसभा निवडणूक : ग्रामीण भागातही वाढतोय निवडणुकीचा फिव्हर

**अरुण जोशी**

**दि.२६ अमरावती**

आदर्श आचारसंहिता लागू होताच विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी सोशल मीडियावर आमचाच नेता आमदार होणार, अशी टॅगलाइन सुरू केली आहे. गावागावांत पारावर चर्चेला उधाण आले आहे. काही हौशी कार्यकर्ते तर विधानसभेचे तिकीट अमक्याला, तमक्याला मिळेल, यासाठी पैजा लावत आहेत.

निवडणुकांच्या प्रचारासाठी राजकीय पक्ष वेगवेगळ्या तंत्रांचा अवलंब करीत असतात. त्यामध्ये सभा, पदयात्रा, बॅनर आदींचा वापर केला जातो. पूर्वी गावात 'ताई, माई, अक्का मारा शिक्का' ही घोषणा देणारी जीप आली की, निवडणुकीची धामधूम सुरू झाल्याचे निश्चित होते; पण आता डिजिटल युगात उमेदवारांची प्रचाराची धुरा इव्हेंट कंपन्यांनी घेतली आहे. त्यामुळे रस्त्यावरच्या कार्यकर्त्यांपेक्षा सोशल हँडलर्सचा चांगलाच वट वाढला आहे. सध्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सगळीकडे सुरू झाली आहे. जाहीर सभांना अद्याप सुरुवात नसली, तरी जाहिरातीच्या माध्यमातून आणि सोशल माध्यमांवरील विविध पोस्ट, रिल्स यावरून प्रचाराला सुरुवात झाली आहे. व्हाईस ओव्हर, ग्राफिक्स, व्हिडीओ क्लिपच्या माध्यमातून मतांचा जोगवा मागितला जात आहे. थेट मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठीचा पर्याय म्हणून सगळ्याच राजकीय पक्षांनी याचा पुरेपूर वापर करायला सुरुवात केलीआहे. उमेदवारांसाठी गाणी लिहिणे, गाणे, भाषणे तयार करणे, रथ तयार करणे, मतदारसंघातील मतदारांचे सर्वेक्षण अशी सर्वच कामे इव्हेंट कंपनी करून घेते. त्यामुळे कार्यकर्त्यांवरील ताण कमी झाला आहे.हे सोशल हँडलर्स नेत्यांचे व्हिडीओ, फोटो, मेसेज लगेच व्हायरल करतात. इतकेच नव्हे, तर ते ब्रेडिंग करण्याचे काम करत असल्याने काही दिवसांत नेत्यांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत.

आजही गाठीभेटी, चौकात सभा यांचे महत्त्व कमी झालेले नाही. पण, फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, ट्विटर यासारख्या माध्यमांतून उमेदवारांचे सोशल हँडलर्स पोस्ट टाकत आहेत. त्यामुळे उमेदवारासाठी जणू प्रचारदूतच बनले आहेत. मतदानाचा उत्तरोत्तर हायटेक प्रचाराचा फंडा वाढत जाईल, यात शंका नाही.

### तरुणाईला मिळाल्या रोजगाराच्या नव्या संधी

इव्हेंट कंपन्यांना नेत्याचा प्रचार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सोशल मीडिया हँडलर्सची गरज भासते; परंतु सोशल मीडियाचा प्रभावी वापर करण्याचे कौशल्य असलेल्यालोकांची कमतरता आहे. त्यामुळे कंपन्यांकडून विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना उमेदवारांच्या सोशल मीडिया टीमचा भाग बनून पैसे कमावण्याची संधी मिळाली आहे. मागील दोन महिन्यांत मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची मागणी वाढली आहे.

# जिल्हा प्रशासनाच्या मधाचे बोट होर्डिंग सर्वांचे आकर्षण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

विधानसभा निवडणुकीदरम्यान कुठेही गैरप्रकार होऊ नये यासाठी स्थिर सर्वेक्षण पथकांनी सजग राहून जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले आहेत सोबतच मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजवावा आणि कोणत्याही प्रचाराला बळी पडू नये या करिता शहरात जनजागृती करण्यात येत अहे त्यासाठी विविध फाळके सध्या आकर्षणाचे केंद्र बनले आहे. शहरातील विविध भागात हे बोर्ड सर्वांचे लक्ष आकर्षित करीत आहे

निवडणुकीदरम्यान मतदारांना आकर्षित करण्यासाठी रोख, दारू, दागिने, अंमली पदार्थ आणि भेटवस्तूंचा वापर केला जाऊ शकतो. असे गैरप्रकार रोखण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथकांनी वाहतूक हालचालींवर कडक नजर ठेवावी. संशयास्पद हालचाल आढळल्यास कसून तपासणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले आहेत सोबतच जिल्ह्यात विविध प्रकारचे होर्डिंग जिल्हा प्रशासनाच्या वतीने लावण्यात आले आहेत

# अमरावती विधानसभा निवडणूक महायुतीच जिंकणार - प्रविण पोटे पाटील

## प्रविण पोटे पाटील व भाजपा अमरावती यांच्या वतीने सौ सुलभाताई खोडके यांचे स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती.**

अमरावती विधानसभा निवडणूक महायुती चा उमेदवार च बहुमताने जिंकणार असून सर्व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांनी प्रचाराच्या कामाला एकजुटीने लागण्याचे निर्देश अमरावती भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी दिले.

जनसंपर्क कार्यालयात अमरावती येथे आयोजित विधानसभा महायुतीच्या प्रचारार्थ नियोजन बैठकीला अमरावती विधानसभा महायुतीच्या उमेदवार सौ सुलभाताई संजय खोडके यांचे भाजपा शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील व भाजपा अमरावती शहर यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.अमरावती विधानसभा निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यावर लढल्या जाणार आहे महायुती सरकार च्या काळात शहराचा विकास मोठ्या प्रमाणात झाला असून महायुती सरकारच्या सर्व योजनांची माहिती घरोघरी पोहचावी तसेच जास्तीत जास्त मतांनी आपल्या उमेदवाराला बहुमताने निवडून आणण्यासाठी दिवसरात्र एकजुटीने मेहनत करण्याचे आवाहन या प्रचार नियोजन बैठकीत प्रविण पोटे पाटील यांनी केले.यावेळी संजय खोडके, जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, दिनेश सूर्यवंशी, रवींद्र खांडेकर, चेतन पवार, विवेक कलोती, अनिता ताई राज, प्रशांत शेगाकार, सतीश कोसिया, बादल कुळकर्णी, कौशिक अग्रवाल सह प्रदेश पदाधिकारी व मोर्चा प्रदेश पदाधिकारी प्रदेश कार्य. सदस्य , शहर कार्यकारणी, मोर्चा अध्यक्ष, मंडळ अध्यक्ष , मंडळातील मोर्चाचे प्रमुख ,नगरसेवक, प्रकोष्ठ सेल अध्यक्ष ,शक्ती केंद्र प्रमुख उपस्थित होते.

# विधानसभेसाठी १९० चिन्हे जाहीर : कोटापासून बुटापर्यंतचा समावेश

## जेवणाचे ताट, आइसक्रीमसह अन्य कित्येक मजेशीर चिन्हांची पंगत : अपक्ष उमेदवारांची प्रचार करतांना होणार धांदल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती:**

हिरवी मिरची, नरसाळे, झगा, पॅन्ट, फणस, प्लॉवर, कोल्हापुरी पायताण, उड्या मारण्याची दोरी, कॅम, स्वीच बोर्ड, लोकर व सुई, पक्कड, ड्रील मशीन... अहो, तुम्हाला ही घरातील साहित्याची यादी वाटत असेल तर जरा थांबा, या दैनंदिन गरजेच्या वस्तू कितीही महाग झाल्या असल्या तरी निवडणूक आयोगाने मात्र विधानसभा निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारांवर चिन्हांच्या रूपाने मुक्तहस्ताने उधळण केली आहे. यातील काही चिन्हे पारंपरिक, काही बदलत्या काळाला अनुसरून तर काही अगदीच मजेशीरअशीच आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवारी अधिसूचना जाहीर झाली. त्यानंतर निवडणूक विभागाने विधानसभा मतदारसंघांसाठी अर्ज भरण्यात येणाऱ्या कार्यालयांबाहेर राष्ट्रीय पक्षांचे राखीव चिन्ह व अपक्ष उमेदवारांसाठीच्या मुक्त चिन्हांची मोठी यादीच लावली आहे. यातील बरीचशी चिन्हे मजेशीर आहेत. काही चिन्हे अशी आहेत की, ती मिळालेल्या उमेदवाराची प्रचार करताना कसरत होणार आहे. ती चिन्हे पाहत अनेक जण त्या ठिकाणी थांबून उत्सुकतेने पाहताना दिसतात. तसेच त्यावर चर्चा करताना दिसत आहेत.

**फळे व भाज्या:** सफरचंद, फणस, अक्रोड, कलिंगड, फ्लॉवर, सिमला मिरची, हिरवी मिरची, फळांची टोपली, मटर, भुईमूग, केक, द्राक्षे, चॉकलेट, आले, भेंडी, पाव.

**दागिने, कपडे :** कानातले, नेकलेस, बांगड्या, अंगठी, कोट, बूट, कोल्हापुरी चप्पल, बेल्ट आदी.

**अन्य साहित्य:** दाढी करण्याचे ब्लेड, पंचिंग मशीन, स्वीच बोर्ड, खिडकी, कपडे अडकविण्यासाठी भिंतीची पट्टी, स्कूल बॅग, उशी, किचनमधील सिंक, करवत, हातगाडी, विटा, खाट

**घरातील साहित्य :** कचरापेटी, जेवणाचा डबा, सेफ्टी पिन, नेल कटर, टूथपेस्ट, ब्रश, कात्री, पेट्रोलपंप, पाणी गरम करायचे रॉड, लायटर, कडी, पेन स्टॅण्ड, टाय, नुडल्सचे वाडगे, दरवाजाची कडी, फ्रीज, टी.व्ही., लॅपटॉप, मशीन, जातं, पोळपाट लाटणं, टोस्टर, वॉशिंग मशीन, जातं.

# नितीन कदम यांच्या जनसंवाद बैठकीचा झंझावात

## कॉर्नर सभा,गृहभेटीचा धडाका ..!बडनेरा शहर व ग्रामीण भागात दिल्या भेटी..कदम यांचा 'विजयाचा संकल्प'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

बडनेरा विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल कालपासून सुरुवात झाली आहे. असे असताना बडनेरा क्षेत्रात लोकप्रिय असलेले संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम सोमवारी २८ ऑक्टोम्बर रोजी प्रचंड मोठ्या शक्तिप्रदर्शनासोबतच भव्य रॅलीसोबत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.अश्यातच त्यांच्या बैठकीचा झंझावात संपूर्ण बडनेरा विधानसभा मतदार संघात बघायला मिळत आहे. 'एकच ध्यास बडनेरा क्षेत्राचा सर्वांगीण विकास' ही ब्रीदवाक्य घेऊन कदम यांनी संपूर्ण बडनेरा विधानसभा क्षेत्र पिंजून काढण्याची सुरुवात केली. बडनेरा शहर भागातील नवी वस्ती,जुनी वस्ती, बारीपुरा, बाजार चौक,यशोदा नगर परिसर, फ्रेजरपुरा परिसर, कलोती नगर,दस्तूर नगर, जलाराम नगर,अमर कॉलनी ,मंगलधाम परिसर , महादेव खोरी, बेनोडा, उत्तम नगर, संजय गांधी नगर, वडरपुरा, पंचशील नगर व इतर ग्रामीण भागातील भातकुली तालुक्या अंतर्गत गावे आसरा, सायत, ऋणमोचण, नांदेडा, खालकोणी, गनोजादेवी, गनोरी व इतर गावामध्ये नितीन कदम यांच्या आगामी विधानसभा निवडणुकी संदर्भात कॉर्नर भेटी, गृहभेटी, व जनसंवाद बैठकीचा झंझावात संपूर्ण बडनेरा क्षेत्रात बघायला मिळत आहे.विविध सार्वजनिक ठिकाणी मंदिरे,बुद्ध विहारे,मुस्लिमबहुल भागातील सार्वजनिक ठिकाणी या जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे.आपल्या आयोजित बैठकीच्या अध्यक्षीय मनोगताद्वारे बडनेरा क्षेत्राचा सर्वांगीण विकास,वीज, पाणी, आरोग्य, स्वच्छता, निवारा, सामाजिक एकात्मता, रोजगार,स्त्री संशक्तीकरण अश्या विविध बहूआयामी विषयावर लक्ष वेधून घेत आहे.नितीन कदम यांचा वाढता जनसंपर्क बघता आगामी निवडणूकीकडे सर्व विरोधकांचे लक्ष लागलेले आहे.